मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | शनिवार, २३ ऑगस्ट २०२५ | वर्ष: १ | अंक:८३ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटी स्थापन

**परभणी, दि. २२ प्रतिनिधी**

परभणीमध्ये घडलेल्या हिंसाचारानंतर न्यायालयीन कोठडीत असलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांचा संशयास्पद मृत्यू झाला होता. आता या प्रकरणात अखेर विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे. या प्रकरणाची सखोल आणि पारदर्शक चौकशी व्हावी, यासाठी राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी एसआयटीची अधिकृत घोषणा केली असून, यामध्ये परभणी जिल्ह्यातील एकाही पोलीस अधिकारी किंवा कर्मचाऱ्याचा समावेश करण्यात आलेला नाही. एसआयटीचे नेतृत्व सुधीर हिरेमठ यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. हिरेमठ हे सध्या पुणे सीआयडीचे विशेष पोलीस महानिरीक्षक आहेत आणि नुकतेच सीबीआयमधून महाराष्ट्रात बदली होऊन आलेले अधिकारी आहेत. त्यांच्याकडे या प्रकरणाचा तपास जबाबदारीने सोपवण्यात आला आहे.

## अग्राग्रलेख — खरीखरी

### नक्षल, राष्ट्रध्वज आणि तरुण

१५ ऑगस्ट या आपल्या स्वातंत्र्य दिन सोहळ्याच्या पर्वावर छत्तीसगडमधील कांकेर येथे बस्तर सारख्या ठिकाणी एका स्वाभिमानी तरुणाने देशभक्तीचा परिचय देऊन नक्षलवाद्यांच्या भीतीनंतरही राष्ट्रध्वज फडकवला. आपल्या देशातील नक्षलवादी चळवळ जवळजवळ संपलेली आहे असे सरकारने जाहीर केलेले आहे. परंतु अजूनही नक्षलवाद्यांचे काही अड्डे कायम आहेत. अशा भागात या देशभक्त तरुणाने राष्ट्रध्वज फडकावला. ही राष्ट्राभिमानी कृती केल्यामुळे त्याच्या या घोर अपराधाबद्दल तेथील काही नक्षलवाद्यांनी त्याच गावात जन अदालत भरवली, भर दिवसा भरवलेल्या जन अदालतीमध्ये या देशभक्त तरुणाला पोलिसांचा मुखबीर म्हणजेच टीप देणारा असे जाहीर केले. त्या ठिकाणी आरोप करणारे नक्षलवादी होते, न्याय देणारेही नक्षलवादीच होते. त्यामुळेच त्याची कोणतीही गोष्ट न एकता त्याला मृत्यू दंडाची शिक्षा फर्मावण्यात आली आणि थोड्याच वेळात या तरुणाला भर गावासमोर गळा आवळून त्याची जीवनलीला संपवण्यात आली. तो तरुण आपल्या देशाच्या ध्वजासाठी आणि भारत मातेसाठी शहीद झाला. इतके झाल्यावर सुद्धा त्याच्या कुटुंबीयांनी पोलिसात तक्रार करण्याची हिम्मत केली नाही. मग या ठिकाणी नक्षलवाद्यांचा दरारा किती असेल याची कल्पनाच केलेली बरी. देशाच्या स्वातंत्र्यदिनी घडलेली ही घटना त्यानंतर दोन दिवसांनी पोलिसांना कळली. मात्र असे क्रुर कृत्य करणाऱ्या लोकांचा छडा अद्यापी पोलिसांनाही लागलेला नाही. ही नक्षलवादी चळवळ ज्या लोकांनी स्थापन केली, त्यामध्ये मुख्य तीन लोक होते. कनू संन्याल, चारू मुजुमदार आणि जंगली संथाल या तिघांनी या चळवळीची स्थापना केली. स्थापना केलेल्या मधील जंगली संथाल आणि चारू मुजुमदार नंतर मरण पावले तर कनू संन्याल यांनी आत्महत्या केली. मुळात ज्या उद्देशाकरिता ही चळवळ उभी केली होती तो उद्देश सफल न होता त्याला वेगळेच वळण लागल्याने हे तीनही संस्थापक दुःखी होते. विशेष म्हणजे क्रांतीची बीजे रोवण्यासाठी ज्या तिघांनी शस्त्रे हाती घेतली ते तिघेही कफल्लक होते. त्यानंतर मात्र नक्षलवादाच्या नावाखाली ज्या गुन्हेगारी टोळ्या जन्माला आल्या. ते खंडणीखोर नंतर चमडीचोर आणि भोगवादी झाले. त्यांच्या मतानुसार ते सांगतील किंवा ठरवतील तो न्याय, ज्याला दोषी ठरवले तो पोलिसांचा मुखबीर म्हणजेच खबरी पुरवणारा आहे आणि अशा पोलिसांच्या हेरांना यातना देऊन मारणे हीच यांची क्रांती अशा गोष्टी पुढे आल्या. आपल्या सरकारने अनेक क्षेत्रांमधील नक्षलवाद्यांना एक तर संपवले आहे किंवा ते शरण आले आहेत. एवढी प्रचंड कसरत झाल्यावरही नक्षलवाद्यांची काही बेटे आजही शिल्लक आहेत, हेच यातून निष्पन्न होत आहे. नक्षलवादाचा हा रोग ज्या ज्या भागांमध्ये आहे त्या भागात त्यांची अजूनही दहशत आहे. मध्यंतरी त्यांच्या म्होरक्यांनी शांततेची भाषा केली होती. सरकार ती मान्य करणे शक्यच नव्हते कारण यांना ठेचायचेच हा सरकारचा बाणा होता. मात्र अजूनही १००% नक्षलवादी संपलेले नाहीत कारण ज्या ठिकाणी ते शिल्लक आहेत त्या ठिकाणी अजूनही सुडाच्या नावाखाली दहशत पसरवून खंडणी खोरीचा प्रवास सुरू आहे. परवाच्या घटनेत जे क्रौर्य दिसले त्या ठिकाणी माणुसकी संपली होती, माणसे संपली होती आणि त्यांचे श्वापदात रूपांतर झाले होते. या श्वापदांनी ज्या ध्येयवादी राष्ट्रभक्त तरुणाचा जीव घेतला त्याला शहिदाचा दर्जा देऊन त्याच्या कुटुंबीयांना सरकारने दिलासा दिला पाहिजे. राष्ट्रभक्तीसाठी हौतात्म्य पत्करलेल्या तरुणासाठी आमची दुःखी मनाने श्रद्धांजली!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

### उद्या अंक नाही

बैलपोळानिमित्त दै. महासागरच्या सर्व कार्यालयांना सुट्टी आहे. त्यामुळे रविवार दि. २४ ऑगस्ट २०२५ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही याची सर्व वाचक, जाहिरातदार, वृत्तपत्र विक्रेता यांनी नोंद घ्यावी.

# राष्ट्रध्वज फडकवल्याने तरुणाची हत्या

## नक्षलवाद्यांचे क्रूर कृत्य

**कांकेर (छत्तीसगड), दि. २२ वृत्तसंस्था**

**राष्ट्रीय ध्वज फडकवला म्हणून नक्षलवाद्यांनी एका तरुणाची हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. छत्तीसगडमधील बिनागुंडा गावात सदर घटना घडली आहे. काही दिवसांपूर्वी आपण सर्वांनी देशाचा स्वातंत्र्य दिवस अत्यंत उत्साहाने आणि अभिमानाने साजरा केला. मात्र छत्तीसगडमधील कांकेर जिल्ह्यातील बिनागुंडा गावात मुनेश नूरूटी या तरुणाची स्वातंत्र्यदिनी भारताचा राष्ट्रीय ध्वज फडकावल्याने नक्षलवाद्यांनी हत्या केली. या घटनेने छत्तीसगडमधील बस्तर परिसरात नक्षलवाद्यांच्या क्रूरतेने कळस गाठल्याचे अत्यंत दुर्दैवी प्रसंग समोर आले आहे.**

बारावी उत्तीर्ण मुनेश नूरूटी गावातील मोजक्या शिक्षित तरुणांपैकी एक होता. त्यामुळे त्याने १५ ऑगस्ट रोजी बिनागुंडा या आपल्या गावातील शाळेत नक्षलवाद्यांच्या दहशतीचा प्रतीक असलेल्या नक्षल स्मारकावरच राष्ट्रीय ध्वज फडकवण्याचा धाडस केला. तो व्हिडीओ चित्रित केला गेला आणि नंतर तो व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. तसेच ध्वज फडकवल्याचा मुनेश नूरूटीचा हा व्हिडीओ नक्षलवाद्यांपर्यंतही पोहोचला. नक्षलवाद्यांची एक तुकडी दुसऱ्या दिवशी गावात दाखल झाली आणि त्यांनी गावकऱ्यांसमोर जन अदालत भरवली.. त्यामध्ये नक्षलवाद्यांकडून राष्ट्रीय ध्वज अभिमानाने फडकवणाऱ्या मुनेशला आरोपी ठरवत पोलिसांचा मुखबीर सांगण्यात आलं. जन अदालतमध्ये मुनेशला दोषी ठरवत मृत्युदंड देण्यात आलं. नक्षलवाद्याने त्याच दिवशी मुनेशची गळा आवळून हत्या केली.

कुटुंबीयांनी नक्षलवाद्यांच्या भीतीपायी या



घटनेची तक्रार पोलिसांकडे केली नाही आणि मुनेशचे अंत्यसंस्कार करण्यात आले. १७ ऑगस्ट रोजी नक्षलवाद्यांनी गावाजवळ एक बॅनर लावलं आणि त्यामध्ये मुनेशला पोलिसांचा मुखभिर असल्याचे सांगत त्याला गद्दार असे सांगण्यात आले आणि त्याच्या हत्येची जबाबदारी स्वीकारण्यात आली. आता पोलिसांनी या घटनेची नोंद घेतली असून तपास सुरू करण्यात आलं आहे. 15 ऑगस्ट रोजी मुनेशने नक्षल स्मारकावर अभिमानाने राष्ट्रीय ध्वज फडकवण्याचा व्हिडीओ ही पोलिसांपर्यंत पोहोचला असून राष्ट्रीय ध्वज फडकवल्यामुळे मुनेशची हत्या करण्यात आली आहे का या दृष्टिकोनातून आमचा तपास सुरू असल्याची माहिती कांकेरचे पोलीस अधीक्षक कल्याण एलीसेला यांनी दिली आहे. संपूर्ण भारतात स्वातंत्र्यदिनी राष्ट्रीय ध्वज प्रत्येक नागरिक अभिमानाने फडकावत असताना त्याच भारतात बस्तर क्षेत्रातील मागास आणि नक्षलवाद्यांच्या दहशत असलेल्या गावांमध्ये कशा पद्धतीने कायद्याची आणि संविधानाची पायमल्ली नक्षलवाद्यांकडून केली जाते याचा हा अत्यंत दुर्दैवी वाईट आणि लाजिरवाणा प्रसंग म्हणावा लागेल.

## आम्ही चौकटीच्या बाहेर जाणार नाही - शरद पवार

**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**

उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार सी.पी. राधाकृष्णन यांना मदत करण्याबाबत मुंख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मला फोन आला होता, पण आम्ही त्यांना नकार कळवला आहे, असे राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगितले. शुक्रवारी राष्ट्रवादीच्या बैठकीनंतर शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन उपराष्ट्रपती निवडणुकीबाबत आपली भूमिका स्पष्ट केली.

यावेळी शरद पवार म्हणाले, "उपराष्ट्रपती पदासाठी सत्ताधारी पक्षाने त्यांचा उमेदवार उभा केला आहे. त्यानंतर इंडिया आघाडीच्या बैठका झाल्या. आम्ही सुदर्शन यांचे नाव निश्चित करून त्यांचा फॉर्मही भरला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मला फोन केला होता.



राधाकृष्णन महाराष्ट्राचे राज्यपाल असल्याने त्यांना पाठिंबा द्यावा, अशी विनंती त्यांनी केली. पण आम्ही फडणवीसांना सांगितलं की, राधाकृष्णन आमच्या विचारांचे नाहीत. आमच्याकडे मतांची संख्या कमी आहे. एनडीएकडे जास्त आहे, पण आम्हाला त्याची चिंता नाही. आम्ही चौकटीच्या बाहेर जाणार नाही," असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांना फोन करून भारताच्या उपराष्ट्रपतीपदाच्या येत्या निवडणुकीत एनडीएचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सीपी राधाकृष्णन यांना पाठिंबा देण्याची विनंती केली. याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, "मी उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्याशी बोललो आणि त्यांना उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या उमेदवारीला पाठिंबा देण्याची विनंती केली. उद्धव यांनी मला सांगितले की ते चर्चा करतील आणि मला कळवतील. शरद पवार यांनी मात्र त्यांना विरोधी पक्षाने उभे केलेल्या उमेदवारासोबत जावे लागेल," असे सांगितले."

## मतदार पुनिरीक्षण प्रक्रियेसाठी आधार कार्डही ग्राह्य धरले जाणार

**नवी दिल्ली, दि. २२ वृत्तसंस्था**

बिहारमधील मतदार यादीत सुधारणा (SIR) करण्याच्या प्रक्रियेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला एक मोठा आदेश दिला आहे. कोर्टाने स्पष्टपणे सांगितले आहे की, मतदार यादीत दुरुस्ती करण्यासाठी मागितलेल्या ११ कागदपत्रांमध्ये आधार कार्डचाही समावेश केला जावा. हा निर्णय अशा लाखो लोकांसाठी दिलासादायक आहे, ज्यांच्याकडे इतर आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नाहीत. याव्यतिरिक्त, सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक अधिकाऱ्यांना आजच्या आदेशाची माहिती सर्व राजकीय पक्षांना देण्यासही सांगितले आहे.

सध्या तरी सर्वोच्च न्यायालयाने बिहारमधील मतदार यादी सुधारण्याच्या ( प्रक्रियेची अंतिम मुदत (डेडलाइन) वाढवण्यास नकार दिला आहे. मात्र, कोर्टाने असेही म्हटले आहे की, जर मोठ्या प्रमाणात अर्ज किंवा प्रतिक्रिया आल्या, तर डेडलाइन वाढवण्यावर



विचार केला जाऊ शकतो. याचा अर्थ कोर्टाला या प्रक्रियेत लोकांचा आणि राजकीय पक्षांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. सर्वोच्च न्यायालयाने सर्व राजकीय पक्षांच्या बूथ लेवल एजंट्स यांना त्या ६५ लाख लोकांची यादी तपासण्यास सांगितले आहे, ज्यांची नावे मतदार यादीच्या मसुद्यातून (ड्राफ्ट) वगळण्यात आली आहेत. कोर्टाने १४ ऑगस्टच्या आपल्या आदेशाचा पुनरुच्चार करताना सांगितले की, ज्या लोकांची नावे वगळण्यात आली आहेत, ते ऑनलाईन अर्ज करू शकतात आणि त्यांना प्रत्यक्ष अर्ज करण्याची आवश्यकता नाही. ही सुविधा बिहारबाहेर राहणाऱ्या लोकांसाठी अत्यंत सोयीची ठरेल.

निवडणूक आयोगाने कोर्टाला सांगितले की, मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या ६५ लाख नावांपैकी २२ लाख लोक मृत आढळले आहेत, तर ८ लाख नावे डुप्लिकेट (दुबार) आहेत. आयोगाने हेही स्पष्ट केले की, जर लोकांनी स्वतःहून पुढे येऊन दावा केला, तर त्यांच्या अर्जांची तपासणी केली जाईल. दुसरीकडे, याचिकाकर्त्यांचे वकील प्रशांत भूषण आणि वृंदा ग्रोवर यांनी निवडणूक आयोगावर टीका केली की, आयोग योग्यरित्या काम करत नाहीये. प्रशांत भूषण यांनी असाही आरोप केला की, सर्वात मोठ्या विरोधी पक्षाने फक्त अर्ध्याच मतदारसंघांमध्ये बीएलए नेमले आहेत. या सर्व बाबींवर विचार करून, सर्वोच्च न्यायालयाने सर्व १२ राजकीय पक्षांना या निर्णयाची माहिती देण्यास आणि कोर्टात एक स्टेटस रिपोर्ट सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. कोर्टाने या प्रकरणावर आपली नजर कायम राहील असे आश्वासनही दिले आहे.

## पुढचे काही दिवस 'मुसळधार' कोसळणार

**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**

मागील चार दिवसांपासून राज्यातील काही भागात मुसळधार पाऊस सुरू होता. २७ सप्टेंबर रोजी राज्यभरात गणरायचे आगमन होणार आहे. पण या वर्षी ऐन गणेशोत्सवात मुसळधार पावसाचेही आगमन होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, २५ ऑगस्टच्या सुमारास वायव्य बंगालच्या उपसागरात आणि उत्तर ओडिशा आणि गंगीय पश्चिम बंगालमध्ये एक नवीन कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. २४ ऑगस्टपासून पूर्व भारत आणि लगतच्या भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

पुढील ७ दिवसांत कोकण आणि गोवा, मध्य महाराष्ट्रात मुसळधार पाऊस सुरू राहण्याची शक्यता आहे, तर २५ आणि २६ ऑगस्ट रोजी कोकणात खूप मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर पुढील ५ दिवसांत गुजरात किनाऱ्यावर आणि २२ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र किनाऱ्यावर जोरदार पृष्ठभागावरील वारे (४०-५० किमी प्रतितास वेगाने) वाहण्याची शक्यताचा असल्याचे हवामान विभागाने सांगितले.

पुढील ७ दिवसांत मध्य प्रदेश, छत्तीसगड, उप-हिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीम, बिहारमध्ये काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. २६ आणि २७ ऑगस्ट रोजी विदर्भ २२ ते २६ ऑगस्ट दरम्यान ओडिशा, झारखंड, गंगीय पश्चिम बंगाल. २२ ऑगस्ट रोजी पश्चिम मध्य प्रदेश, गंगीय पश्चिम बंगाल; २२ आणि २३ ऑगस्ट रोजी झारखंड, बिहार; २२, २५ आणि २६ ऑगस्ट रोजी ओडिशा आणि २५ ते २७ ऑगस्ट दरम्यान छत्तीसगडमध्ये काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## पृथ्वीराज चव्हाणांच्या पुतण्याचे तीन ठिकाणी मतदान - भाजपाचा आरोप

**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी याच महिन्यात मतचोरीचा आरोप करत निवडणूक आयोग आणि केंद्रातील मोदी सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. राहुल गांधींनी हे आरोप करताना मतदार यादीतील घोळ समोर आणला, त्यानुसार जिवंत व्यक्तींना मृत दर्शवण्यात आले असून बोगस नावेही यादीत आहेत, काहींची नावे दोन-तीन मतदारसंघातही पाहायला मिळाली. आता, राहुल गांधींच्या आरोपानंतर भाजपानेही काँग्रेस नेत्यांना लक्ष्य केलं आहे. काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे पुतणे इंद्रजीत चव्हाण यांचे मतदान तीन ठिकाणी असल्याचा आरोप भाजपच्या वतीने करण्यात आला आहे. तसंच भाजपाचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनीही एक पोस्ट केली आहे.

चोराच्या वाटा चोरालाच ठाऊक असते असे म्हणतात. चोरी करायची आणि चोरी झाल्याचा कांगावाही करायचा ही चोरांची रीत असते. याचे राहूल गांधीची मतचोरी मोहीम हा त्यातलाच प्रकार! मतचोरी विरोधात आवाज उठवणाऱ्या गांधींच्या कॉंग्रेसी पिलावळीनेच त्यांच्या मतदारसंघातील मतदारयादीत घोळ केल्याचे उघड होत आहे. गांधी घराण्याचे निष्ठावंत आणि राहुल गांधीचे विश्वासू असलेले पृथ्वीराज चव्हाण यांना मतचोरी विरोधी समितीमधे सामील करून कॉंग्रेसने चोराहाती चाव्या दिल्या.त्यांच्याच मतदार संघांतील मतदारयादीत नवे नवे चमत्कार उघडकीस येत आहेत.

मतदार याद्यांतील गोंधळ, बनावट नोंदणी, आणि एकाच व्यक्तीची अनेक ठिकाणी नोंद.. हे सर्व पाहता, घरातच मतचोरीचा मास्टरप्लॅन घरातच तयार झाला का, याची चौकशी व्हायला हवी. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या कुटुंबीयांची एक, दोन नव्हे तर तीन-तीन ठिकाणी नोंदणी, वयात फरक, पत्त्यांचे खेळ. ही निवडणूक प्रक्रियेचा थट्टा नाही तर काय? आणि त्याच व्यक्तीच्या अध्यक्षतेखाली कॉंग्रेसने मतचोरीविरोधी समिती नेमली आहे? म्हणजे चोराला चोरीच्या वाटा शोधण्याची जबाबदारी देणे.

पाटण कॉलनीतील एका घराच्या पत्त्यावर १५ मतदार नोंदणीकृत, त्यापैकी अनेकजण त्या ठिकाणी राहत नाहीत. कराड दक्षिण विधानसभा मतदार संघात दुबार, तिबार मतदान नोंदणी झाली आहे. पृथ्वीराज चव्हाण यांनी दुबार मतदार नोंदणी करून २०१४, २०१९ ची निवडणूक जिंकल्याचा आरोप भाजपाचे पदाधिकारी विद्यमन आमदार डॉ. अतुल भोसले यांच्या पदाधिकाऱ्यांनी केला. 'व्होटचोरी' कराड दक्षिणेत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनीच केल्याचेही अतुल भोसले यांच्या कार्यकर्त्यांनी म्हटले आहे.

अतुल भोसलेंनी जे आरोप केले आहेत, त्यातून खरे वोट चोर कोण हे समोर आलं. याचं उत्तर राहुल गांधींनी दिलं पाहिजे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

## राज्यातील महापालिकांची प्रभागरचना सोमवारी प्रसिद्ध होणार

### मुंबईची प्रभागरचना 'जैसे थे'

**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**

राज्यातील राजकीय पक्षांना आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांना आता निवडणुकांचे वेध लागले असून दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे फटाके फूटणार आहेत. त्यासाठी, राज्य निवडणूक आयोग आणि प्रशासनाचं कामकाज सुरू झालं असून राज्य निवडणूक आयोगाकडून मुंबई महापालिका सह गट अ, ब आणि क वर्गातील महापालिकांच्या प्रभाग रचना २५ ऑगस्टला प्रसिद्ध करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. दरम्यान, मुंबईची वॉर्डनिहाय रचना 'जैसे थे' असल्याचे सूत्रांनी सांगितले.

महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करणे आणि त्यावर हरकती सूचना मागवणे यासाठी २२ ते २८ ऑगस्टचा वेळ देण्यात आला आहे. मात्र, काही महापालिकांचे प्रारूप प्रभाग रचना प्रस्ताव हे राज्य निवडणूक आयोगाला महापालिकांकडून उशिरा प्राप्त झाल्याने सोमवारी प्रभाग रचना प्रसिद्ध करणार असल्याची माहिती महापालिकेतील सूत्रांकडून देण्यात आली आहे.

प्रभाग रचना प्रसिद्धीनंतर सूचना व हरकतींवर सुनावणी घेऊन प्रभाग रचना अंतिम करण्याचं काम केलं जाईल आणि त्यानंतर प्रभाग रचना आराखडा नगर विकास विभागाला पाठवला जाणार आहे. राज्यातील २९ महानगरपालिकांपैकी १० महापालिकांच्या प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाला प्राप्त झाल्या आहेत. गट ड च्या महापालिकांच्या प्रभाग रचना संबंधित महापालिकांकडून प्राप्त होत असल्याची माहिती आहे. मुंबई,नागपूर,पुणे,ठाणे,नाशिक, पिंपरी चिंचवड, छत्रपती संभाजी नगर,वसई विरार,नवी मुंबई या महापालिकांच्या प्रभाग रचना संबंधित महापालिकांकडून राज्य निवडणूक आयोगांकडे प्राप्त झाल्या आहेत. सोमवारी यातील बहुतांश महापालिका प्रभाग रचना प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न राज्य निवडणूक आयोगाकडून केला जाईल. दरम्यान, 'ड' वर्गाच्या महापालिकांच्या प्रभाग रचना या 3 सप्टेंबर रोजी प्रसिद्ध होणार आहेत आणि त्यानंतर त्यावर हरकती मागवल्या जातील.

## तुरुंगवारी करणाऱ्या कारकुनाची खुर्ची जाते मग पंतप्रधानाची का जाऊ नये ?

### पंतप्रधान मोदी विधेयकावर ठाम

**गया, दि. २२ वृत्तसंस्था**

केंद्र सरकारने पावसाळी अधिवेशना दरम्यान लोकसभेत तीन महत्त्वाची विधेयके मांडली. गंभीर गुन्हेगारी आरोपांमध्ये अटक झाल्यास किंवा ताब्यात घेतल्यास पंतप्रधानांपासून ते राज्यांचे मुख्यमंत्री, मंत्री आणि जम्मू व काश्मीरसह केंद्रशासित प्रदेशांच्या मंत्र्यांना पदच्युत करण्याची तरतूद या विधेयेकात आहे. या विधेयकातील तरतुदींनुसार, जर एखादा मंत्री गंभीर गुन्ह्याच्या प्रकरणात सलग ३० दिवस तुरुंगात असेल, तर राष्ट्रपती किंवा पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार त्याला पदावरून काढून टाकता येणार आहे.

या विधेयकावरून विरोधकांनी सरकारवर टिकेची झोड उठवली आहे. एवढंच नाही तर या



विधेयकावरून विरोधकांनी सभागृहात देखील गदारोळ केला होता. विरोधक इंडिया आघाडीने केलेल्या आरोपांना आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्युत्तर देत या कायद्यावर ठाम भूमिका व्यक्त केली. बिहारच्या गयाजी येथील एका सभेत बोलताना पंतप्रधान मोदी यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली.'तुरुंगवारी करणाऱ्या कारकुनाची खुर्ची जाते मग पंतप्रधानाची का जाऊ नये?, असं म्हणत पंतप्रधान मोदी यांनी त्या विधेयकाबाबत ठाम भूमिका मांडली आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.

"जर एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याला ५० तास तुरुंगवास झाला तर त्याला नोकरीवरून निलंबित केलं जातं. मग पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा मंत्र्यांनाही असाच नियम का लागू होऊ नये? जर एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याला ५० तास तुरुंगवास झाला तर तो निलंबित होतो. मग तो ड्रायव्हर असो, लिपिक असो किंवा शिपाई असो. मात्र, मुख्यमंत्री, मंत्री किंवा अगदी पंतप्रधान तुरुंगातूनही सरकारमध्ये राहण्याचा आनंद घेऊ शकतात. मात्र, आता एनडीए सरकारने भ्रष्टाचाराविरुद्ध कायदा आणला असून त्या कायद्याच्या कक्षेत पंतप्रधानही येतात", असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

## आरएसएस बंदी असलेली संघटना आहे का?

### फडणवीसांचे सुनेत्रा पवारांवरील टीकेला प्रत्युत्तर

**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी व राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार यांनी दिल्लीत 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघा'शी संबंधित राष्ट्र सेविका समितीच्या बैठकीला हजेरी लावल्याने वाद निर्माण झाला आहे. यावरून महाविकास आघाडीतील नेत्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटावर टीका केली आहे. यासंदर्भात देवेंद्र फडणवीस यांना प्रतिक्रिया विचारण्यात आली होती.

खासदार व अभिनेत्री कंगणा रानौत यांच्या नवी दिल्लीतील निवासस्थानी संघाची महिला



शाखा असलेल्या राष्ट्रसेविका समितीच्या बैठकीत सुनेत्रा पवार यांनी हजेरी लावली होती. भगवा ध्वज, डॉ. हेडगेवार, गोळवलकर आणि भारतमातेच्या तसबिरी असलेल्या या बैठकीत सुनेत्रा पवार यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करतानाचा फोटो समोर आला होता. यावर खासदार सुनेत्रा पवार यांनी स्पष्टीकरणही दिले होते. पत्रकारांशी संवाद साधत असलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत स्पष्ट शब्दांत भाष्य केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ बंदी असलेली संघटना आहे का, अशी विचारणा करत, मी स्वतः राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्वयंसेवक आहे आणि मला त्याचा अभिमान आहे. मला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने नेहमी राष्ट्रवाद शिकवला. समाजातील प्रत्येक व्यक्तीला सोबत घेऊन आपल्याला देशाचे कल्याण करायचे आहे, अशीच शिकवण संघाने दिली आहे. त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमात कुणी गेले, तर त्यावर एवढा आकांडतांडव करण्याची आवश्यकता का आहे, असा सवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला.

दरम्यान, टीका होत असताना सुनेत्रा पवार यांनी देखील त्यांची भूमिका स्पष्ट केली होती. त्यांनी एक्सवर यासंबंधी एक पोस्ट केली आहे. एका मीटिंगमध्ये माझ्या उपस्थितीबाबत चर्चा सुरू आहे, ज्याबाबत मी स्पष्टीकरण देऊ इच्छिते की, त्यामागे कोणताही राजकीय उद्देश नव्हता. यात इतर महिला खासदारही सहभागी होत्या. राज्यसभेची खासदार म्हणून आणि बारामतीमध्ये दीर्घकाळ सामाजिक कार्य करत असताना, मला विविध महिला संघटनांच्या कामाची प्रत्यक्ष ओळख करून घेण्याची उत्सुकता असते. त्या बैठकीत विविध राज्यांतील महिला सहभागी होत्या. त्यांचे उपक्रम आणि कार्यपद्धती समजून घेण्यासाठीच मी तिथे गेले होते. त्या वेळी मला बोलण्यास सांगितले, तर मी फक्त दोन शब्दांत माझी भूमिका मांडली, असे सुनेत्रा पवार यांनी स्पष्ट केले.

**काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व महाराष्ट्राचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांना अप्रत्यक्षपणे ठार मारण्याची धमकी चक्क एका कीर्तनकाराने दिल्याने महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे. धमकी देणाऱ्याचा वारकरी संप्रदायाशी संबंध असल्यामुळे या घटनेला महत्त्व प्राप्त झाले आहे. परंतु 'आपल्याला नथुराम गोडसे व्हावे लागेल' असे म्हणताना सदर महाराज क्षणभरही कचरले नाही. त्यामुळे यापूर्वी महात्मा गांधीच आजही त्यांच्या विचाराने जीवंत असल्याचे म्हटले जात असायचे. पण आता या देशात नथुराम गोडसे अजूनही जिवंत असल्याचे वरील विधानावरून दिसून येते. कीर्तन म्हणजे भजन, संतवाणी, समाजाला मार्गदर्शन आणि आत्मिक शांती देण्याचं व्यासपीठ. पण काही लोकांनी हे पवित्र व्यासपीठ राजकीय रंगमंचात बदलून टाकलं आहे. एक कीर्तनकार कीर्तनाच्या नावाखाली विशिष्ट पक्षाची जाहिरात करतो, विरोधी आमदारावर टीका करतो आणि 'आम्हाला नथुराम गोडसे व्हावं लागेल' अशी उधळण करतो! मग तो खरोखरच कीर्तनकार आहे की एखाद्या पक्षाचा प्रवक्ता? धर्माच्या नावाखाली राजकारणाचा डोस देणं, कीर्तनकाराच्या नव्हे तर 'राजकीय एजंट'च्या तोंडातूनच शोभून दिसतं. समाजात संतांचे विचार रुजवण्याऐवजी गोडसेवादाचं बीज पेरणं हा संतवचनांचा अपमान नाही का? कीर्तनाचं व्यासपीठ राजकीय प्रचारासाठी वापरणाऱ्यांचा समाजाने पर्दाफाश केला पाहिजे. विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म, सकळ धर्म मज विठोबाचे नाम, संत तुकाराम महाराज सांगतात विश्वामध्ये भगवंताचा वास आहे आणि सर्वांशी प्रेमाने वागणे हाच खरा धर्म आहे, असेही ते सांगतात. विठ्ठलाचे नामस्मरण करणे हाच खरा धर्म आहे आणि हीच खरी वारकरी पंथाची शिकवण आहे. मानवता हा एकच धर्म आहे हेच वारकरी पंथ सांगतो आहे. असे असूनही नव्या पिढीतील एक वारकरी चक्क नथुराम गोडसेचा वारसा चालवतो याला काय म्हणावे? कीर्तनातून प्रखर हिंदुत्वाची मांडणी करणारे आणि महायुतीची बाजू उचलून धरणारे कीर्तनकार संग्राम भंडारे यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांना मारण्याची धमकी दिली. बाळासाहेब थोरात यांना उद्देशून 'आम्हाला नथुराम गोडसे व्हावे लागेल', असे म्हणत असल्याचा त्यांचा व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे. त्यानंतर आता नवीन वाद उफाळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

# 'महात्मा गांधी'च नव्हे तर 'नथुराम गोडसे'ही जीवंत?

संग्राम भंडारे महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि हिंदुत्वाबद्दल एका कार्यक्रमात बोलायला सुरुवात केली. भंडारे यांच्या प्रखर हिंदुत्वाच्या मांडणीवर उपस्थित काँग्रेस विचारसरणीच्या काही कार्यकर्त्यांनी आक्षेप नोंदवला. संगमनेर शहरालगत असणाऱ्या घुलेवाडी गावात सुरू असलेल्या कीर्तनावेळी काहीजणांनी राजकीय भाष्य करत असल्याचा आक्षेप घेत गोंधळ घातला. यानंतर हभप संग्राम महाराज भंडारे यांना मारहाण झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे खवळलेल्या संग्राम भंडारे या महाराजांचा एक व्हिडिओ संगमनेर शहरात व्हायरल झाला व या व्हिडिओत त्यांनी थेट `आम्हाला नथुराम गोडसे व्हायला लावू नका` अशी बाळासाहेब थोरातांना धमकी दिली. या महाराजांच्या वक्तव्याची काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठांनी देखील गंभीर दखल घेतली त्यामुळेच काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, आमदार सत्यजित तांबे आदींनी संग्राम भंडारे यांनी केलेल्या त्या वक्तव्याचा चांगलाच समाचार घेतला. संगमनेरमध्ये प्रवचन सांगणाऱ्या व्यक्तीच्या तोंडी नथुरामाची भाषा शोभत नाही. बाळासाहेब थोरात हे समाजातील विघातक वृत्तीना विरोध करतात म्हणून त्यांना उघडपणे जीवे मारण्याची धमकी दिली जात असेल तर ते योग्य नाही. गृहमंत्र्यांना आमचा सवाल आहे, राज्यात पोलिसांचा धाक आहे की नाही? कीर्तनकार आता काँग्रेस नेत्यांना उघडपणे जीवे मारण्याची धमकी देणार, गुन्हा दाखल करण्याची धमकी देणार हे योग्य आहे का? राजकारण एका बाजूला, पण उघडपणे नेत्यांना जीवे मारण्याची धमकी कीर्तनकारांनी देणे हे सर्व मर्यादा ओलांडणे आहे. महाराष्ट्रातील राजकारण इतक्या खालच्या थराला कधीच गेले नव्हते, असंही त्यांनी म्हटलं. बाळासाहेब थोरातांवर टिका करताना विरोधक सुध्दा जपून शब्द वापरतात. त्यामुळे संत-महात्म्यांची परंपरा असलेल्या महाराष्ट्रात स्वतः ला कीर्तनकार म्हणून घेणाऱ्या एका व्यक्तीने त्यांच्या विषयी जे काही बोलले ते महाराष्ट्रातील कोणत्याही वारकरी संप्रदायातील किर्तनकारांनाही आवडले नाही. सहकार, शिक्षण, कृषी, सांस्कृतिक सगळ्याच क्षेत्रात अग्रेसर असलेल्या संगमनेरचे नाव अलिकडे बदनाम होवू लागले आहे. खऱ्या वारकारी संप्रदायाच्या परंपरेत काहीजण राजकारण करण्यासाठी घुसले आहेत. महाराजांचे कीर्तन तिथं कुणीही थांबवलं नाही, कोणताही हल्ला त्यांच्यावर झालेला नाही, त्यांच्या गाडीची तोडफफोड झालेली नाही, तिथं पत्रकार मंडळी होती. त्यांना सर्व माहिती आहे', असे थोरातांनी पत्रकार परिषदेत जाहीरपणे सांगितले. परंतु खोट्या-नाट्या केसेस करणे असे उद्योग सुरू झालेले आहेत. हजारो वर्षापासून महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून संतांचे विचार घराघरात पोहोचण्याचा पायंडा हा अखंडपणे सुरू आहे. धर्मातील अनिष्ट चालीरीतींवर कीर्तनाच्या माध्यमातून प्रहार करणारे अनेक कीर्तनकार या महाराष्ट्रात घडून गेले आणि सध्या सुद्धा ते हे कार्य मोठ्या जोमाने करताना दिसतात. परंतु गेल्या काही दिवसांपासून वारकरी संप्रदायाचा जो मूळ पाया आहे, जो मूळ उद्देश आहे तो बाजूला ठेवून धर्मांधता कशी वाढीस लागेल याचा प्रचार करणारे अनेक नवनवीन महाराज अस्तित्वात आले असून यांचा उद्देश हा वेगळाच दिसतो आहे. 'आम्हाला नथुराम गोडसे व्हावं लागेल' असे बोलणारा खरंच वारकरी संप्रदायाचा प्रचारक असू शकतो का? या धमकीचा नेमका अर्थ काय होतो? महाराष्ट्रातील सुसंकृत व संयमी नेते अशी ओळख असलेल्या बाळासाहेब थोरात यांना अशा प्रकारची धमकी स्वतःला हरिभक्त पारायण समजणारा एक महाराज देतो आहे. वारकरी संप्रदाय हे महाराष्ट्राचे भूषण आहे. या संप्रदायाने जगाच्या कल्याणाची शिकवण मानवजातीला दिलेली आहे. अशा व्यासपीठावर कीर्तनकाराने कुठल्याच राजकारणी व्यक्तीचे नाव घेऊ नये. 'वर्णावी ते थोरी एका विठ्ठलाची कीर्ती मानवाची सांगु नये'. राजकीय स्टेज असते तिथे तुम्हाला काय बोलायच ते बोला, त्याला भाषण म्हणतात. विशिष्ट विषय असतो आणि विशिष्ट उद्देशाने माणस एकत्र आलेली असतात. कीर्तनात सर्व समाजातील सर्व पक्षाची लोक एकत्र आलेली असतात. अशा वेळी एखाद्या पक्षाचे, एखाद्या विशिष्ट व्यक्तीचे गुणगान सांगू नये. देव, देश, धर्म, भक्ती, ज्ञान, वैराग्य, थोर पुरुष, थोर समाजसुधारक, हुतात्मे यांच्याबाबत महती सांगितली तर चालेल. पण राजकारण सांगायला नको आहे. राजकारणातील व्यक्तींची नावे व्यासपीठावर घ्यायलाच नको. कीर्तनकाराने समाज संघटीत करायचा असतो. श्रोत्यांच्या अंतःकरणात भगवंताविषयी प्रेम निर्माण करावे, भक्ती विषयी निष्ठा निर्माण करावी. संसाराची आसक्ती कमी करावी. श्रोत्यांचे मन बुद्धी परमार्थात विलीन करावे. याबाबत वारकरी संप्रदायाने सजग राहायला हवे. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती, आपणासी जे जे ठावे ते इतरांशी सांगावे, ज्ञानी करूनी सोडावे सकळजन', असा संदेश देणारे आमचे संत महात्मे आणि आता राजकीय पक्षांचा अजेंडा चालणारे तथाकथित महाराज लोक या अशा स्वतःला वारकरी संप्रदायाचे प्रचारक समजणाऱ्या महाराजांपासून वारकरी संप्रदायाने सावध राहण्याची गरज निर्माण झाली आहे. संगमनेर मध्ये बाळासाहेब थोरात यांच्या समर्थनार्थ निघालेल्या विशाल मोर्चामुळे अशा बाबा बुवांना सुबुद्धी झाली तर ठीक. अन्यथा लोकांचा अशा संप्रदायावरील विश्वास हळूहळू कमी होत जाईल. तो होऊ नये असे वाटत असेल तर जनतेने स्वतःच सावध झाले पाहिजे असे वाटते!

## बाळासाहेबांची बलिदान करण्याची तयारी!

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांना कीर्तनकाराने दिलेली धमकी संत परंपरेच्या विरोधात दिसते. बाळासाहेब थोरात हे राज्यातील ज्येष्ठ नेते, माजी महसूल मंत्री तसेच सुसंस्कृत व संयमी नेतृत्व म्हणून परिचित आहेत. अशा नेत्याला थेट जिवे मारण्याची धमकी देणे ही अतिशय निंदनीय आणि लोकशाहीविरोधी बाब आहे. स्वतःला कीर्तनकार म्हणवणाऱ्या संग्राम भंडारे यांनी दिलेली ही धमकी केवळ संतपरंपरेच्या पवित्र भूमीचा अपमान नाही, तर वारकरी संप्रदायालाही न पटणारी आहे. त्यामुळेच थोरातांनी जीवे मारण्याच्या धमकीवर भाष्य केले. `मी काही महात्मा गांधी नाही अन् होऊ शकत नाही. परंतु असा कुणी नथुराम गोडसे समोर आल्यावर, विचार अन् तत्वासाठी आनंदानं बलिदान स्वीकारील`, असे उदगार काढून त्यांनी गांधीवाद दाखवून दिला. तरीदेखील अशा प्रकारे धमकी देणाऱ्या समाजकंटकांवर सरकारने कडक कायदेशीर कारवाई करायला हवी. पण सरकार या लोकांवर कारवाई करणार नाही, असे दिसते. कारण सरकारचा मूळ उद्देश हाच असून एक प्रकारे हे काम सरकार चालविणारे लोक विविध लोकांच्या आडून करताना दिसतात. आता या सर्व बाबींना सरकार प्रतिबंध कसे काय करू शकतील?

## महाराजांविरोधात वारकरी संप्रदाय मैदानात

वादग्रस्त कीर्तनकार संग्रामबापू भंडारे यांच्या विरोधात वारकरी संप्रदाय मैदानात उतरला आहे. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या विषयी वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी अनेकांनी महाराजांचे त्यांचे कान टोचले आहे. स्वतःला कीर्तनकार आणि समाज प्रबोधनकार म्हणून घेणाऱ्या लोकांची भाषा दुसऱ्याला संपवण्याची असते का?असा सवाल केला आहे. ज्या महात्मा गांधीजींनी सहिष्णुतेचा धडा सबंध राष्ट्राला दिला. भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनात महत्त्वाची भूमिका बजावली त्या राष्ट्रपित्याचा वध करणाऱ्या नथुराम गोडसे यांचे उदात्तीकरण करून आम्हाला नथुराम व्हावं लागेल, अशी संतापजनक टिप्पणी करणाऱ्या संग्राम बापू विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी राष्ट्रवादी अध्यात्मिक व वारकरी आघाडीचे नाशिक जिल्हा प्रमुख प्रा. अमर ठोंबरे यांनी केली आहे. दुसरीकडे महाराजांच्या गावी कसबे सुकेने येथे त्यांच्या समर्थनार्थ ग्रामस्थांनी एक दिवसाचा बंद केला. आता महाराजांची राजकीय भूमिका त्यांच्या गावातील लोकांना आवडलेली दिसते. आता देश कोणत्या दिशेने निघाला याचा अंदाज केलेलाच बरा. महात्मा गांधीं बरोबरच नथुराम समर्थकांची देखील आता गर्दी होऊ लागली हेच खरे!








थर्ड अम्पायर
जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९९४२०

## महत्त्वाचे

### आदर्श शिशुविहार वाघ गुरुजी येथे बैलपोळा साजरा

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज संचलित आदर्श शिशुविहार वाघ गुरुजी शाळेत पारंपरिक बैलपोळा सण मोठ्या उत्साहात व



आनंदात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थी शेतकरी व शेतकरीण यांच्या वेशभूषेत सजून आले होते, ज्यामुळे संपूर्ण शाळा परिसरात सणाचा पारंपरिक रंग भरला गेला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका पुष्पा लांडगे उपस्थित होत्या. त्यांनी बैलांची पूजा करून कार्यक्रमाची सुरुवात केली. यानंतर शाळेचे संगीत शिक्षक शेवाळे यांनी पारंपरिक बैलपोळा गाणे सादर करत वातावरण अधिकच उत्साही केले. कार्यक्रमास शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका पाटील तसेच आदर्श शिशुविहार वाघ गुरुजी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. पारंपरिक सणाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये ग्रामीण संस्कृतीची ओळख निर्माण होण्यास मदत झाली, असे मत अनेकांनी व्यक्त केले.

### कवी गोडसेंचा अ. भा. मराठी साहित्य परिषदेकडून सत्कार

**नाशिक ।** नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज निवृत्त सेवक संघाच्यावतीने माणिकराव गोडसे यांचा अखिल भारतीय मराठी साहित्य



परिषद पुणे आयोजित चौथे राज्यस्तरीय राजकुमार काळभोर मराठी साहित्य संमेलन वानवाडी पुणे येथे नाशिक जिल्हाध्यक्ष म्हणून कवी माणिकराव गोडसे यांना सन्मानित करण्यात आले. त्याबद्दल त्यांचा यशोचित सत्कार निवृत्त सेवक संघाचे अध्यक्ष ॲड उत्तमराव जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. त्यांच्या समवेत सर्व कार्यकारी मंडळ उपस्थित होते.

## जनावरांच्या खरेदी-विक्री व्यवसायास कायदेशीर संरक्षणाची मागणी
# कुरेशी समाजाचा बेमुदत बंद





**नाशिक ।** जिल्ह्यातील कुरेशी समाजाने जनावरांच्या खरेदी-विक्री व्यवसायावर होत असलेल्या अन्यायकारक व बेकायदेशीर त्रासाविरोधात १७ जुलैपासून बेमुदत बंद पुकारला आहे. यासंदर्भात समाजाच्या प्रतिनिधींनी मंत्री छगन भुजबळ व पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांना निवेदन देत मागण्यांकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी आग्रही भूमिका मांडली आहे.

कुरेशी समाजाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ अंतर्गत प्रत्येक नागरिकास व्यवसाय करण्याचा अधिकार आहे. तथापि, मागील काही काळापासून जनावरांची वाहतूक करणाऱ्या व्यापाऱ्यांना विविध संघटनांकडून वारंवार त्रास सहन करावा लागत आहे. व्यापाऱ्यांच्या गाड्या रस्त्यात अडवणे, टायरमध्ये खिळे टाकणे, मारहाण करणे व नंतर पोलिसांच्या ताब्यात देणे असे प्रकार वाढले आहेत. वाहतुकीदरम्यान जप्त झालेली जनावरे पोलिसांकडून खाजगी गौशाळांमध्ये पाठवली जात असून, तेथे दररोज प्रति जनावर ३०० ते ६०० रुपये खर्च आकारला जातो. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी १-२ महिने लागल्याने व्यापाऱ्यांवर १६,५०० ते १८,००० रुपयांचा आर्थिक बोजा पडतो. न्यायालयाचा निकाल व्यापाऱ्यांच्या बाजूने लागल्यानंतरही अनेकदा जनावरे परत मिळत नाहीत किंवा दयनीय अवस्थेत मिळतात, अशी तक्रार करण्यात आली. या आंदोलनाला काँग्रेसकडून पाठिंबा जाहीर देण्यात आला. काँग्रेस कमिटी नाशिक शहराचे उपाध्यक्ष राजेंद्र बागुल यांनी प्रशासनाने तातडीने या प्रश्नाकडे लक्ष न दिल्यास मोठ्या प्रमाणावर तीव्र आंदोलन उभे राहू शकते, असा इशारा दिला. "व्यवसाय करण्याचा मूलभूत अधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न होत आहे. कुरेशी समाजाच्या न्याय्य मागण्या मान्य होणे आवश्यक आहे," असे बागुल यांनी नमूद केले.

**अडथळा झाल्यास व्यापाऱ्यांनी थेट तक्रार करावी**

या सर्व पार्श्वभूमीवर समाजाने सरकार व प्रशासनासमोर ठेवलेल्या मागण्यांमध्ये म्हटले आहे की, व्यापाऱ्यांच्या व्यवसायास कायदेशीर संरक्षण व सुरक्षा द्यावी, रस्त्यावर गाड्या अडवणाऱ्या संघटनांवर कठोर कारवाई करावी, पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यापूर्वी आवश्यक कागदपत्रांची तपासणी करावी, जप्त जनावरे खाजगी गौशाळेऐवजी सरकारी गोशाळांमध्ये ठेवावीत, न्यायालयीन आदेशानंतरही जनावरे परत न दिल्यास संबंधितांवर कारवाई करावी, बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर व्यापाऱ्यांना व शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देणाऱ्या उपाययोजना कराव्यात, सर्वत्र कायदेशीर स्लॉटर हाऊसची उभारणी करून त्यांचे संचालन स्पष्ट करावे, २०१४ ते २०२५ या कालावधीत खरेदीदारांवर दाखल झालेले गुन्हे रद्द करावेत, मटन दुकानदारांना अधिकृत परवाने द्यावेत. 'एक कुटुंब, एक नोकरी' योजना कुरेशी व शेतकरी वर्गासाठी लागू करावी. मंत्री छगन भुजबळ व पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी व्यापाऱ्यांची भेट घेऊन सकारात्मक प्रतिसाद दिला. "जनावरांच्या खरेदी-विक्री व वाहतुकीस कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण झाल्यास व्यापाऱ्यांनी थेट तक्रार करावी. कायदेशीर व्यवसाय सुरळीत सुरू ठेवा," असे आश्वासन त्यांनी दिले.

## सिन्नर-कोमलवाडी विद्यालयात समाज दिन उत्साहात साजरा



**सिन्नर ।** मराठा विद्या प्रसारक समाजाचे जनता विद्यालय कोमलवाडी येथे १९ ऑगस्ट रोजी संस्थेचे आद्य कर्मवीर रावसाहेब थोरात यांची जयंती म्हणजेच समाज दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

मुख्याध्यापक अमोल नाईक यांनी आपल्या प्रास्ताविकातून संस्थेच्या सर्व कर्मवीरांचा महिमा वर्णन केला. तसेच शालेय समितीचे अध्यक्ष शरद घुले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमासाठी उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते सर्व कर्मवीरांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. शाळे समिती सदस्य सोमनाथ जाधव यांनी आपल्या मनोगततून कर्मवीरांच्या कार्याची माहिती दिली. तसेच अध्यक्ष भाषणातून शरद घुले यांनी देखील सर्व कर्मवीरांच्या कार्याला उजाळा दिला. यावेळी एस.एस.सी.परीक्षा मार्च २०२५ मध्ये उत्तीर्ण प्रथम पाच क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरित करण्यात आले. तसेच ठेवी वरील व देणगी स्वरूपात बक्षीस इयत्ता पाचवी ते दहावीच्या प्रथम पाच क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक नाईक शालेय समिती अध्यक्ष शरद घुले, लहान कोंडाजी घुले, सोमनाथ जाधव , लहानू घुले, खंडू बोंबले, तानाजी बोंबले,राजाराम उगले, ठोके, सचिन गिते, सौरभ कमानकर शालेय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिशमहल ठरणार यंदा इच्छापूर्ती गणेशाचे मुख्य आकर्षण

## त्रिमूर्ती नगर कला, क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळ उभारणार भव्य देखावा



**नाशिक ।** त्रिमूर्तीनगर कला, क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळ यंदाच्या गणेशोत्सवात एक अनोखा आणि विशेष देखावा साकारणार आहे. यंदा मंडळाने शिशमहालाचा देखावा साकारण्याचे ठरवले आहे.

शिशमहाल दिसण्यास सुरेख असल्याने याची एक वेगळी विशेषतः आहे. देशातील विविध ठिकाणी असलेले शिशमहाल पाहण्यासाठी देश-विदेशातून पर्यटक येत असतात. असाच एक शिशमहाल नाशिककरांना पाहता यावा याकरिता हा देखावा सकरण्यात येत असल्याचे मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अंबादास खैरे यांनी सांगितले. देखाव्यासाठी फायबरचा वापर करण्यात येत असून हिरावाडी रोड परिसरात ६० x ३० च्या भव्य स्टेज उभारणीचे काम सध्या जोमाने सुरू झाले असून, देखाव्याचे भूमिपूजन संस्थापक अध्यक्ष अंबादास खैरे यांनी केले. त्रिमूर्तीनगर कला, क्रिडा व सांस्कृतिक मित्र मंडळ विविध सामाजिक कार्य करत असून दरवर्षी रक्तदान शिबिर, महिलांचे अथर्वशीर्ष स्तोत्र पठण, लहान मुलांसाठी दरवर्षी गणेशोत्सवात वेगवेगळ्या स्पर्धांचे मंडळाच्या वतीने आयोजन करण्यात येते. या गणेशोत्सव काळात होम मिनिस्टर या खेळाचे विशेष आकर्षण महिलांमध्ये असणार आहे, अशी माहिती अध्यक्ष सागर तांबे, कार्याध्यक्ष मयूर गोसावी व सहकार्याध्यक्ष सागर पुरकर यांनी दिली.

# पेठ तहसील कार्यालयात निराधारांचा मेळावा



**पेठ ।** तालुक्यातील संजय गांधी निराधार , इंदिरा गांधी वृध्दापकाळ योजना , इंदिरा गांधी विधवा योजना इंदिरा गांधी दिव्यांग योजना , श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजना यातील बहुतेक लाभार्थीना आधार कार्ड बॅक खात्याशी लिंक नसल्याने त्यांच्या खात्यावर पैसे जमा होत नसल्याने निराधार लाभार्थ्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

या अडचणी लक्षात घेत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) चे युवा नेते गोकुळदादा झिरवाळ यांनी येथील तहसिल कार्यालयातील आवारात लाभार्थ्यांचे आधार कार्ड लिंक करण्यासाठी व विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. केंद्र शासन पुरस्कृत योजना इंदिरा गांधी वृध्दापकाळ योजनेचे १४२०८ लाभार्थी ,इंदिरा गांधी विधवा योजनेचे, ८८३ इंदिरा गांधी दिव्यांग योजनेचे, १७२ असे एकुण १४८६३ राज्य शासन पुरस्कृत योजना संजय गांधी योजना १०४५ श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजना १७१२ असे एकुण २७५७ या पैकी १८६८ लाभार्थ्यांचे बॅक खाते लिंक करणे बाकी असल्याची माहीती संगोयो योजनेचे नायब तहसीलदार रामकिशन राठोड यांनी दिली. सदरील मेळाव्यात गोकुळ झिरवाळ यांनी वयोवृद्ध लाभार्थ्यांपर्यंत जात त्यांच्या अडचणीची सोडवणुकीसाठी अधिकारी वर्गाशी चर्चा करून तात्काळ समस्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न केले.या मेळाव्यात साठी तालुक्यातून मोठ्या प्रमाणात लाभार्थी आले होते. यावेळी तहसीलदार आशा गांगुर्डे (संघवी) संगायोचे नायब तहसीलदार रामकिशन राठोड नायब तहसीलदार दिपक गोवर्धने, अमर म्हात्रे गोकुळ झिरवाळ, शिंदे ग्रामपंचायतीचे उपसरपंच हिरामण पवार,रामदास गवळी ,गणेश गवळी बाळु गवळी सुयोग गवळी, गणेश गावीत आदीसह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिनॅस्ट संयुक्ताला क्रीडामंत्र्यांकडून दूरध्वनीवर शुभेच्छा!

**नाशिक ।** रिदमिक जिम्नॅस्टिक्स मध्ये भारताचं प्रतिनिधित्व करणारी महाराष्ट्राची हिरकणी संयुक्ता काळे हिची वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२५, रिओ साठी निवड झाली असून, ब्राझील देशात स्पर्धा सुरु होण्यापूर्वी क्रीडामंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी संयुक्ताला दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या. तसेच भारताचे प्रतिनिधित्व करताना सुवर्णपदक जिंकण्याच्या तिच्या क्षमतेवर विश्वास व्यक्त करीत तिला "महाराष्ट्राची हिरकणी" म्हणून संबोधत तिचा गौरव केला.

यावेळी कोकाटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वतीनेही शुभेच्छा दिल्या. तिच्या प्रशिक्षक मानसी गावंडे आणि पूजा सुर्वे यांच्यासह संयुक्ताच्या पालकांचे अभिनंदन केले आहे. तसेच येत्या काळात आवश्यक असलेल्या क्रीडा सोयी सुविधासाठी थेट दूरध्वनी करण्यावचे आवाहन करायला कोकाटे विसरले नाहीत. ब्राझील आणि भारत देशाच्या वेळेत आठ तासाचा फरक असल्याने तिकडे स्पर्धा सुरु होण्यापूर्वी भारतातून रात्री उशिरा हा फोन केल्याचे समजते. रिदमिक जिम्नॅस्टिक्स क्षेत्रात महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. ठाण्यातील संयुक्ता प्रसेन काळे ही आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचं प्रतिनिधित्व करण्यासाठी वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२५, रिओ (ब्राझील) या भव्य स्पर्धेसाठी निवडली गेली आहे. तिच्यासोबत भारताच्या संघाच्या प्रशिक्षक म्हणून मानसी गावंडे यांचीही निवड करण्यात आली आहे.



## महत्त्वाचे

### एसएमबीटी रुग्णालयाजवळ सराईत गुन्हेगार गग्गा जेरबंद

**नाशिक ।** गुप्त बातमीनुसार वाडीवऱ्हे पोलीस ठाणे हद्दीत घोटी–सिन्नर रस्त्यावरील एसएमबीटी रुग्णालयाजवळ सराईत गुन्हेगार पुरुषोत्तम संजय गिरी उर्फ गग्गा (रा. नांदगाव सदो, ता. इगतपुरी, जि. नाशिक) यास पोलिसांनी शिताफीने पकडले. कारवाईदरम्यान त्याच्याकडून १ गावठी कट्टा (पिस्टल), २ जिवंत काडतुसे व धारदार लोखंडी कोयता जप्त करण्यात आला. या प्रकरणी वाडीवऱ्हे पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ व ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.गुन्हेगार गग्गा हा सराईत असून त्याच्यावर यापूर्वीही अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. सध्या तो इगतपुरी पोलीस ठाण्यातील खंडणीच्या गुन्ह्यात फरार होता.या धाडसी कामगिरीसाठी नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील व अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शन लाभले.

### महाराष्ट्र प्लंबिंग असोसिएशनतर्फे सोमवारी जलसंवर्धक मित्रांचा सन्मान

**नाशिक ।** महाराष्ट्र प्लंबिंग असोसिएशनच्या १४ व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी (दि.२५) सायंकाळी ६.३० वाजता उंटवाडी रोडवरील इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग असोसिएशनच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात प्लंबिंग व जलसंवर्धन क्षेत्रात सातत्याने योगदान देणाऱ्या ११ प्लंबर मित्रांचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आ. सीमा हिरे, भाजपा शहराध्यक्ष सुनील केदार, प्राचार्य प्रशांत पाटील उपस्थित राहणार आहेत. सर्व प्लंबिंग मित्र, सभासद, मान्यवर निमंत्रित यांनी उपस्थित राहावे असे आवाहन अध्यक्ष रवि पाटील, सचिव श्रीहरी गांगल व संयोजकांनी केले आहे.

### शिक्षणासोबत आईवडिलांच्या आशीर्वादाची गरज असते : अवचिते

**नाशिक ।** जीवनात कष्टाशिवाय आणि शिक्षणाशिवाय



पर्याय नाही आणि कष्ट करत असताना आपल्या आई-वडिलांचे आशीर्वाद फार मोलाचे असतात असे प्रतिपादन विनजीत टेक्नॉलॉजीचेअसोसिएट व्हॉइस प्रेसिडेंट विशाल अवचिते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. ते भुजबळ नॉलेज सिटी मेट कॉलेज येथे आयटी क्षेत्रातील मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना आपल्या व्यक्तिगत आयुष्यात आलेले अनुभव त्यांनी कथन केले. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतुन शिक्षण घेऊन असोसिएट व्हॉइस प्रेसिडेंट पदापर्यंतचा प्रवास त्यांनी कसा पार केला हे सांगितले. शिक्षणा सोबत आई वडिलांच्या आशीर्वादाची गरज असते, हे ही त्यांनी कथन केले. प्रा नंदकिशोर सोनवणे, चौधरी, आयटी क्षेत्रातील अनेक विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

### कॉलेजरोडला आज विद्युत पुरवठा नाही

**नाशिक ।** महावितरणच्या नाशिक शहर विभाग २ अंतर्गत असलेल्या गोदापार्क या नवीन विद्युत उपकेंद्राला ३३ केव्ही वाहिनी जोडणीच्या कामाकरीता शनिवारी २३ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत कॉलेजरोड व परिसरातील वीज पुरवठा बंद राहण्याची शक्यता आहे. वीज ग्राहकांनी याची नोंद घ्यावी व सहकार्य करावे असे आवाहन महावितरणने केले आहे. यामध्ये गंगापूर रोड, जेहान सर्कल, सहदेव नगर, डी के नगर, डिसूजा कॉलनी,चोपडा लॉन्स परिसर, जुना गंगापूर नाका, नेर्लेकर हॉस्पिटल परिसर, पाटील लेन १ ते ४,पाटील कॉलनी, डोंगरे वस्तीगृह सिग्नल परिसर आणि कॉलेज रोड हा भाग प्रभावित होण्याची शक्यता आहे. दिलेल्या वेळेपुर्वी काम पुर्ण झाल्यास विद्युत पुरवठा तत्काळ पूर्ववत करण्यात येईल. तसेच या दरम्यान शक्य झाल्यास पर्यायी उपकेंद्रावरून वीज पुरवठा करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे, याची वीज ग्राहकांनी नोंद घ्यावी व कृपया सहकार्य करावे असे आवाहन महावितरणच्या नाशिक शहर विभाग-२ चे कार्यकारी अभियंता यांनी केले आहे.

# नाशिक महापालिकेचा इंडिया बुक ऑफ रेकॉर्डस्‌मध्ये विक्रम

## १६००० विद्यार्थ्यांनी साकारले शाडू मातीतून बाप्पांची मूर्ती



**नाशिक ।** नाशिक महापालिका व "द गोदावरी इनिशिटीव्ह स्वयंसेवी संस्था" यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक शहरातील १२० शाळांमधील १६००० विद्यार्थ्यांनी शाडू मातीचा गणपती बनविण्याचा विक्रम प्रस्थापित केला.

नाशिक महापालिकेत पर्यावरण विभागामार्फत पर्यावरणपूरक गणेशोत्सव राबविण्याकरीता नाशिक महापालिकेने मोठे पाऊल उचलले आहे. शाडू मातीच्या श्रीगणेश मूर्ती बनविण्याकरिता महापालिकेने ४५ टन माती उपलब्ध करून दिली होती. त्यासाठी १२० शाळांमध्ये कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याकरिता ३०० स्वयंसेवक, १२० प्रशिक्षक, १० फोटोग्राफर यांची फौज तैनात करण्यात आली होती. या निमित्ताने या प्रकारचा उपक्रम राबविली जाणारी नाशिक महापालिका महाराष्ट्रात पहिली महापालिका असून, यामुळे १२० शाळांमध्ये १६ हजाराच्या वर इकोफ्रेंडली गणेश मूर्तीची निर्मिती झाली आहे. पर्यावरणपूरवक हा उपक्रम असून, गोदावरी संवर्धन करण्याच्या दृष्टीने नाशिक महापालिकेचे हे मोठे पाऊल आहे. येणारा सिंहस्थ कुंभमेळा पर्यावरण पूरक करण्याच्या दृष्टीने नाशिक महापालिकेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जाणार आहे, असे मत पर्यावरण उपायुक्त नितिन पवार यांनी मांडले. याकरिता महापालिकेच्या तीन महिनांच्या अथक परिश्रमातून हा कार्यक्रम यशस्वी पार पडला, असे शिक्षण अधिकारी मिता चौधरी यांनी मत मांडले. या कार्यक्रमाचा समारोप येथील मराठा विद्या प्रसारक समाज हायस्कूल येथे पार पडला. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरण आणि गोदा संवर्धनचे संदेश कायमस्वरूपी रुजविण्यासाठी प्रेरणादायी ठरेल, असे मत मविप्र संस्थेचे प्रशासक मोगल यांनी मांडले. तसेच इंडिया बूक ऑफ रेकॉर्डसचे परीक्षण अधिकारी डॉ. अशोक अडक यांनी या उपक्रमाचे कौतुक करत पुढे असे कार्यक्रम घेण्यास प्रोत्साहन देत महापालिका आणि "द गोदावरी इननिशेटीव्ह" यांना प्रमाणपत्र व मेडल देऊन सन्मानित केले. याकरिता नाशिक महानगरपालिका व गोदावरी इनिशेटीव्ह यांच्या संयुक्त प्रयत्नाने तसेच, एनसीसी, क्लीन इट आल, द ताज गेट वे, रोट्रॅक्ट क्लब, एनएमटी लव कॉलेज, तीळभांडेश्वर् चित्रकला महाविद्यालय यांचे सहकार्य महापालिकेस लाभले. इंडिया बूक ऑफ रेकॉर्डसचे परीक्षण अधिकारी डॉ अशोक अडक यांच्या कडून मनपा आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री यांच्यावतीने उपयुक्त नितीन पवार यांनी पुरस्कार स्वीकारला. याकरिता उपस्थित केंद्रीय प्रदूषण मंडळाचे राहुल बोबे, मराठा हायस्कूलचे थोरात, एनसीसीचे हवालदार विक्रम पाटील आदी उपस्थित होते.

### मसाज पार्लरच्या आड देह व्यापाराचा पर्दाफाश; मुख्य आरोपी महिला जेरबंद

**नाशिक ।** मिळालेल्या गुप्त माहितीनुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक



शहर गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत मसाज पार्लरच्या नावाखाली सुरु असलेल्या अनैतिक देहव्यापार रॅकेटचा पर्दाफाश केला आहे.

सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) संदिप मिटके व वपोनि. डॉ. अंचल मुदगल (पीसीबी-एमओबी, मध्यवर्ती गुन्हेशाखा) यांच्या नेतृत्वाखालील छापा पथकाने मेट्रोझोनसमोर कमर्शिअल गाळा, 'आरंभ स्पा' येथे छापा टाकून मुख्य आरोपी महिला खुशबु परेश सुराणा हिला ताब्यात घेतले. कारवाईदरम्यान कानपूर, दिल्ली, बिहार, मिझोराम आणि नाशिक येथील अशा एकूण ५ पीडित मुली त्या ठिकाणी आढळून आल्या. प्राथमिक तपासात, आरोपी महिलेनं स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी मसाज पार्लरच्या आड या मुलींना अनैतिक देहव्यवसाय करण्यास भाग पाडल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, यापूर्वी देखील आरोपी महिलेविरुद्ध पिटा व पोस्को कायद्यांतर्गत गुन्हे दाखल असल्याचे समोर आले आहे. या कारवाईसाठी पोलीस आयुक्त संदिप कर्णिक, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) किरणकुमार चव्हाण व सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) संदिप मिटके यांचे मार्गदर्शन लाभले. कारवाईत सपोनि. विश्वास चव्हाणके, सपोनि. प्रविण माळी, सपोउनि. शेरखान पठाण, सपोउनि. नामदेव सोनवणे, पोहवा गणेश वाघ, पोहवा समिर चंद्रमोरे, पोहवा प्रजित ठाकुर, निलीमा निकम, लिला सुकटे, मपोअ वैशाली घरटे, पोअं हर्षल बोरसे, चपोहवा दिपक पाटील यांचा मोलाचा सहभाग होता.

# गणेशोत्सव, ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर शहरात पोलिसांकडून कोम्बिंग ऑपरेशन

## १२७ गुन्हेगारांची तपासणी













**नाशिक ।** शहरात गणेशोत्सव व ईद ए मिलाद या दोन मोठ्या सणांच्या पार्श्वभूमीवर गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यासाठी नाशिक पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ १ मध्ये दिनांक २१ रोजी रात्री मोठ्या प्रमाणावर कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले. पोलीस आयुक्त संदिप कर्णिक यांच्या आदेशानुसार आणि परिमंडळ १ चे पोलीस उपआयुक्त मोनिका राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली ही धडक मोहीम पार पडली.

या कारवाई दरम्यान सहाय्यक पोलीस आयुक्त संगीता निकम व नितिन जाधव तसेच सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी व अंमलदार सहभागी झाले होते. कोम्बिंग ऑपरेशनमध्ये रेकॉर्डवरील १२७ गुन्हेगारांना चौकशीसाठी ताब्यात घेऊन तपासणी करण्यात आली. तडीपार असलेल्या ३२ गुन्हेगारांची पाहणी करण्यात आली. त्यापैकी आडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारा सुरज कांतीलाल वर्मा (वय २४, रा. दत्तात्रय नगर, अमृतधाम) याच्यावर मपोका कलम १४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, पंचवटी व भद्रकाली पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैधरीत्या हत्यारे बाळगणाऱ्या ३१ गुन्हेगारांची तपासणी करण्यात आली. घरझडती दरम्यान पंचवटी पोलीस ठाण्याचे पीयूष रामदास सोनवणे (वय १९, रा. अवधुतवाडी) व भद्रकाली पोलीस ठाण्याचे उद्देश कैलास कुंभकर्ण उर्फ मुन्ना कासार (वय २३, रा. भद्रकाली) यांच्या ताब्यातून घातक हत्यारे मिळून आल्याने त्यांच्यावर भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ सह मपोका कलम १३५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले. याशिवाय, एकूण ४२ पाहीजे व फरारी आरोपींची सखोल तपासणी करण्यात आली. पोलिसांनी या कारवाईदरम्यान घरझडती, नाकाबंदी, ऑल आऊट अशा विविध पद्धतींचा वापर करून गुन्हेगारांची काटेकोर तपासणी केली. गणेशोत्सव, ईद ए मिलाद तसेच आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारांवर धाक निर्माण करण्यासाठी पोलिसांकडून अशा प्रकारच्या धडक मोहिमा सुरूच राहणार असून डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून कारवाई आणखी परिणामकारक केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# यंदा सत्तेची चावी काँग्रेसकडेच असेल : आकाश छाजेड

## वैचारिक लढाईतून सर्व १२२ जागांसाठी तयारी; सन्मान राखल्यास महाविकास आघाडीही मान्य











आगामी होऊ घातलेल्या नाशिक महापालिकेच्या निवडणुकांसाठी काँग्रेसने सर्व १२२ जागा लढविण्याची तयारी केली आहे. आम्हाला महाविकास आघाडीही मान्य आहे; परंतु काँग्रेसला योग्य मानसन्मान मिळायला पाहिजे, असे स्पष्ट प्रतिपादन काँग्रेसचे शहराध्यक्ष आकाश छाजेड यांनी दैनिक "महासागर"शी बोलताना केले. शहराचा सर्वांगीण विकास, रस्ते, स्मार्ट सिटीतील भ्रष्टाचार आणि वाढती गुन्हेगारी या प्रमुख मुद्द्यांना घेऊन आम्ही मतदारांसमोर जाणार आहोत, असे सांगत "यंदा सत्तेची चावी काँग्रेसकडेच राहील", असा आत्मविश्वास ही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

आगामी होऊ घातलेल्या नाशिक महापालिकेच्या निवडणुकीसाठी सारेच राजकीय पक्ष आणि इच्छुक मंडळी कामाला लागले आहेत. त्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाची एकूणच भूमिका जाणून घेण्यासाठी काँग्रेसचे शहराध्यक्ष आकाश छाजेड यांच्याशी वार्तालाप केला असता त्यांनी महापालिका निवडणुकीत काँग्रेस पूर्ण ताकतीने उतरणार असल्याचे स्पष्ट केले. आम्ही "वैचारिक लढाई" करणार असल्याचेही अधोरेखित केले. मते चोरून निवडणुका लढण्याची भाजपसारखी आमची नीती नसल्याचे ठासून सांगितले. विधानसभा निवडणुकीत भाजपने मतांची चोरी केल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. भाजपला मतांची चोरी करून निवडणुका लढण्याची सवय असल्याची खरमरीत टीकाही त्यांनी यावेळी केली. काँग्रेसकडे उमेदवार नसल्याचे भाजप सांगते. यावर बोलताना छाजेड म्हणाले, काँग्रेसकडे सर्व १२२ जागा लढविण्यासाठी उमेदवार आहेत. त्याची चिंता भाजपने करू नये. भाजपला निवडणूक लढण्याची भीती वाटते. म्हणूनच बाहेरच्या लोकांना भाजपला पक्षात घ्यावे लागत आहे. त्यांच्या जिवावर भाजप "हंड्रेड प्लस"ची वल्गना करीत असल्याचेही छाजेड म्हणाले.

स्मार्ट सिटीच्या नावाखाली शहरात ७ हजार कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचे सांगत छाजेड यांनी शहरातील रस्त्यांच्या खड्डेमय स्थितीवरही तीव्र नापसंती व्यक्त केली. जनतेच्या पैशांची प्रचंड उधळण झाली आहे, अजूनही होत आहे. गेल्या तीन वर्षापासून महापालिकेत प्रशासक राजवट आहेत. त्यामुळे लोकांची कामे होत नसल्याची स्थिती आहे. भाजप आणि भ्रष्टाचार हे समीकरण झाले असून, ते चित्र काँग्रेस निश्चित बदलेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. आगामी सिंहस्थ कुंभमेळा समीप आला आहे तरी अजूनही फक्त कागदी घोडे नाचविले जात आहे. सरकार स्थापन होऊन आठ महिन्यांचा कालावधी उठूनही अद्याप नाशिक जिल्ह्याला पालकमंत्री मिळालेला नाही. त्यामुळे कामे ठप्प झाल्याचे ते म्हणाले. सर्वधर्मीय नागरिक या शहरात वर्षानुवर्षापासून गुन्यागोविंदाने नांदत आहेत. असे असतानाही भाजपकडून धार्मिक तेढ निर्माण केली जात असल्याचा आरोप यावेळी छाजेड यांनी केला. भाजप मते चोरून निवडणुका लढवत असल्याच्या मुद्द्याचा पुनरुच्चार करताना व्हीव्ही पॅड नाकारणे हे त्याचेच द्योतक असल्याचे छाजेड म्हणाले. निवडणुका आणि निपक्ष झाल्या तर भाजपचा पराभव होईल म्हणून भाजप मतचोरी करीत असल्याचेही ते म्हणाले. हा प्रकार म्हणजे "चोरी तो चोरी उपर से सीना जोरी" असा असल्याचे त्यांनी सांगितले. काँग्रेस पक्षाची शहरात स्थिती ठिक नसल्याचा मुद्दा छाजेड यांनी फेटाळून लावला. विद्यमान स्थितीत एक लाख २२ हजार पेक्षाही जास्त सक्रिय सदस्य असल्याचा दावा करतानाच अजूनही सदस्य नोंदणी सुरू असून, त्यात चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे त्यांनी ठासून सांगितले. काँग्रेसने महापालिका निवडणुका पूर्ण ताकतीने लढविण्याची तयारी केली असल्याचे सांगताना महाविकास आघाडीही आम्हाला मान्य आहे; पण काँग्रेसला योग्य सन्मान मिळायलाच हवा, असेही ते सांगण्यास विसरले नाही. महाविकास आघाडीतील घटक पक्षांची शहरातील ते ते परिसर-भाग यामध्ये प्राबल्य, स्थिती पाहून जागावाटप करण्याचा नेत्यांचा प्रयत्न असेल. त्यादृष्टीने प्रयत्न होतील. काँग्रेसने निवडणुकीसाठी तयारी सुरू केली असून आतापर्यंत ८० इच्छुकांचे अर्ज आले आहेत. अजूनही येत आहेत. जुन्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना प्राधान्य देताना यंदा ५० टक्के उमेदवार हे तरुण, पस्तिशीच्या आतील असतील, असे आमचे प्रयत्न राहणार असल्याचे छाजेड म्हणाले.

### ज्यांना निघून जायचे ते निघून गेले

काँग्रेसमधून मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते, पदाधिकारी दुसऱ्या पक्षात जात आहेत. काँग्रेसमधून जावक वाढली असून, भाजपसह इतर पक्षात प्रवेश घडत आहेत. या मुद्द्याकडे छाजेड यांचे लक्ष वेधले असत "ज्यांना जायचे होते ते निघून गेले आहेत." भाजपकडून अजून हा जाणार, तो जाणार अशा अफवा पसरल्या जात आहेत. जाणारे जात असतात; पण जे निष्ठावंत आहेत ते आजही काँग्रेसबरोबर आहेत. वैचारिक लढाई लढणारा हा पक्ष आहे. त्यामुळे आम्ही या बळावरच निवडणुकीला सामोरे जात आहोत. यावेळी त्यांनी काँग्रेसमधून शिवसेना मार्गे (शिंदे गट) राष्ट्रवादीत (अजित पवार गट) गेलेल्या हेमलता पाटील यांच्यावर खरमरीत टीका केली. काँग्रेसने त्यांना विविध पदे दिली. मानसन्मान दिला. त्यांना अजून काय हवे होते, असा प्रश्न करीत सहा वेळा काँग्रेसच्या निवडून आल्याचे सांगणाऱ्या पाटील यांनी तीन वेळा काँग्रेसच्याच अधिकृत उमेदवाराविरुद्ध बंडखोरी केल्याची आठवण छाजेड यांनी करून दिली. काँग्रेसचे प्राबल्य असलेल्या भागात भाजप कधीही विजयी होऊ शकत नसल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले. उमेदवारी डोळ्यासमोर ठेवून दुसऱ्या पक्षात गेलेले प्रसंगी पुन्हा स्वगृही परतण्याचा निर्णय घेऊ शकतात. याबाबत बोलताना छाजेड यांनी सांगितले की, फक्त निवडणुकीसाठी गेलेल्यांना पुन्हा पक्षात प्रवेश मिळणे अवघड आहे. जर जुन्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी शिफारस केल्यास, त्यांच्याशी सर्वनुमते चर्चाविनिमय करून त्यांना प्रवेश द्यायचा की नाही ते पाहता येईल. हे करीत असताना पक्षातील कार्यकर्त्यांवर जराही अन्याय होऊ देणार नाही, असेही त्यांनी शेवटी सांगितले.

# नागपूरकरांनी कायम ठेवली बडग्या-मारबत परंपरा!

***ईडा पिडा घेऊन जाऽऽ गे मारबत.. मना मनातली अस्वस्थता, हेवेदावे, भीती, रोगराई घेऊन जाऽऽ गे मारबत..***

पोळ्याच्या पाडव्या दिनी मारबतीची परंपरा व ऐतिहासिक मिरवणूक नागपूर नगरीचा ठेवा! ही मिरवणूक तर नागपूरची आन, बान आणि शान आहे, हा उत्सव त्या मागचा उद्देश! पूर्वी मारबत महोत्सव थोडा बिभत्सेकडे झुकलेला होता. त्यामुळे मारबत मिरवणूकीत जाणे हीन अभिरुचीचे मानले जायचे. पण आता परिस्थिती बदलली आहे.

---

भारतातला हा एकमेव उत्सव नागपूर शहरात संपन्न होत असतो, त्या मागे उदात्त हेतू आहे. हे लक्षात आल्याने आता मारबत मिरवणूकीतील असभ्यता बऱ्यापैकी कमी झालेली आहे. कित्येक भाविक स्वतःच्या समस्या दूर व्हाव्यात म्हणून मारबतीला नवस बोलतात.

वर्षानुवर्षे प्रचंड उत्साहात हा सोहळा साजरा होतो, होत राहील. तेव्हा या मारबत सोहळ्यात सहभागी होऊ आणि म्हणूयात, सगळे अशुभ, अमंगळ रूढी घेऊन जाऽऽ गे मारबतऽऽऽ! या आरोळ्यानी दरवर्षी तान्ह्या पोळ्याच्या दिवशी नागपूरातील महाल इतवारी परिसर दुमदुमुन गेलेला असतो. मारबत हा सोहळा संपूर्ण भारतात फक्त नागपूरातच भव्य दिव्य स्वरुपात साजरा होतो. मारबतही नागपूरकरांची अशी ग्रामदेवता आहे की ती या गावावर येणारी सगळी संकटे, आपल्या सोबत दूर घेऊन जाते आणि विसर्जित होते.

काळी मारबत १४५ वर्षापासून चालू आहे. या काळ्या मारबतीचा संबंध महाभारत काळाशी जोडल्या जातो. पुतना मावशीचे रूप धारण करून भगवान कृष्णाला मारण्याचा प्रयत्न केला आणि कृष्णाच्या हातून तिचा मृत्यू झाल्यावर गावकऱ्यांनी तिची धिंड अर्थात मारबत काढली आणि गावाबाहेर तिला जाळले. यामुळे गावावर पुन्हा कधीही समस्या, संकटे आली नाहीत, अशी आख्यायिका आहे. याच संदर्भाने नागपूरातही काळी-पिवळी मारबत काढण्यात येते. या मारबतींना शहराच्या बाहेर जाळल्याने शहरातील कुरीती आणि संकटे संपतात, अशी मान्यता आहे.

मूळात मारबत ही प्रथा मध्यप्रदेशातील काही आदिवासी जमातीत दिवाळीच्या रात्री पाळली जाते. विशिष्ट आकारातली मातीची मूर्ती ईडा पिडा, अमंगलतेचे प्रतिक म्हणून गावाबाहेर ढकलत नेतात. पण मग ही प्रथा खूप वेगळ्या स्वरूपात नागपुरात कशी रुजली?

यामागचा इतिहास असा की, महाराणी बाकाबाई भोसले या नागपूर भोसल्यांच्या राणीने इंग्रजांशी तथाकथित हातमिळवणी केली. त्यामुळे नागपूरचे समाजमानस क्षुब्ध झाले. या घडल्या घटनेचा मोठ्या प्रमाणावर निषेध करण्यासाठी बाकाबाईला स्वार्थी, देशद्रोही ठरवून त्यांचे प्रतिक म्हणून काळ्या मारबतीचा जन्म झाला. तसेच त्यांचे पती रघुजीराजे भोसले (द्वितीय) यांनी त्यांना रोखले नाही म्हणून त्यांचे प्रतिक बडग्याच्या रूपाने अवतरले.

पुढे इंग्रजांना नामोहरम करण्यासाठी कर्तबगार बाकाबाई भोसल्यांची ती रणनीती होती हे सिद्ध झाले. पण सुरू झालेली प्रथा बंद पाडणे नागपूरकरांना शक्य झाले नाही. मग मारबत ही दुष्टता, अमंगळ रूढी यांचे वहन करून स्वतः सोबत घेऊन जाणारी देवता म्हणून जनमानसात रुजली आणि आता वर्षानुवर्षे ही प्रथा पाळली जाते. तर, विविध सामाजिक समस्या, अनिष्ट रूढी, परंपरा यांचे प्रतिक म्हणून विविध पिवळी मारबत निघते.






वैदिक व नंतरच्या काळात बरेचदा वामनाचा उल्लेख आलेला आहे. बुटक्या आणि खुज्या माणसांच्या कथांमध्ये बुटका केवळ ठेंगणा नसतो तर त्यात असाधारण अशी दैवी शक्ती दिसते. हिमगौरी आणि सात बुटके ही कथा प्रत्येकाने वाचली असेलच.

बळीराजाला पाताळात गाडण्यासाठी विष्णूने वामनाचे रूप घेतले तसेच दुसऱ्याही एका कथेत धुंधु राक्षसाचा वामनाचे रूप घेऊन त्याने पराभव केला आहे. कश्यप आणि दनु यांचा मुलगा धुंधु स्वर्गप्राप्ती होण्यासाठी अश्वमेध यज्ञ करतो आणि देव घाबरून विष्णूकडे मदतीसाठी धावतात. त्यामुळे वामनाचे रूप घेऊन विष्णू धुंधुकडे आला आणि आल्यावर देविका नदीच्या पात्रात स्वतःला झोकून दिले.

यज्ञ सोडून सर्वजण त्याला वाचविण्यासाठी गेले तेव्हा तो म्हणाला की, निर्धन असा मी वर्षभरापासून गटांगळ्या खात आहे. धुंधुने त्याला वर मागण्यास सांगितले, तेव्हा वामन म्हणाला, मी बुटका, काय मागणार! मला माझ्या तीन पावलांएवढ्या लांबीची भूमी दे. धुंधुने मान्य केल्यावर वामनाने दोन पावलातच सबंध विश्व व्यापून टाकले आणि तिसरे पाऊल ठेवले ते धुंधु राक्षसाच्या पाठीवरच !



**प्रविण बागडे**
**नागपूर.**
**9923620919**

काळ्या मारबतीला पुतना मावशीचं रूप मानलं जातं. म्हणूनच तिच्या स्तनांमधून दुग्धधारा पाझरतात. अनंत चतुर्थीच्या अगोदर भागवत एकादशीला वामन जयंती असते. हे सर्व दिवस प्राचीन संस्कृतीच्या अद्भुत धाग्याने गुंफलेले आहेत. सर्वच पुराणांमध्ये आहे की, कंसाने पुतनेला बाळकृष्णाला मारण्यासाठी पाठविले. हरवंश आणि पद्मपुराणामध्ये ती रात्री येऊन लहान मुलांना मारते. काळ्या मारबतीने हाच रात्रीचा रंग ल्येवलेला आहे.

भागवत आणि ब्रम्हवैवर्त पुराणानुसार पुतनेच्या मनीचा भाव कसाही असा. श्रीकृष्णाच्या स्पशार्ने तिला मोक्ष प्राप्त झाला. बाळकृष्णाने मारल्यावर गावकऱ्यांनी तिच्या अंगाचे लचके तोडून तिला जाळले. पण त्या धुरातून दिव्य सुगंध येऊ लागला ती मुक्तात्मा झाली, म्हणुन तिचे महत्व.

जन्माष्टमी नंतर सणवार एकमेकांच्या हाता हात गुंफुन येतात पिठोरी अमास्येनंतर भाद्रपदात गौरी-गणपतीचे आगमन होते. खरंतर विचाऱ्या अमावस्येला सर्वजणच आळतात त्यादिवशी मुहूर्त, नवीन खरेदी, गोडधोड काही नसतं. अपवाद फक्त दोनच. एक श्रावणी अमावस्या आणि दुसरी लक्ष्मीपूजनाची आश्विन अमावस्या.

बैलपोळ्याची दर्शग पिठोरी अमावस्या म्हणजे श्रावण आणि भाद्रपदामधला संधिकाल. बैलपोळयापासुन अनंत चतुर्दशीपर्यंत काही सण एकमेकांना बिलगुन उभे आहेत. त्यांच्यातला एक समान दुवा म्हणजे गल्ली-बोळींमधुन अत्यंत उत्साहाने काढण्यात येणाऱ्या मिरवणुका, बैलपोळ्याला सजवलेल्या बैलांची वाजत-गाजत मिरवणूक निघते तर दुसऱ्या दिवशी तान्ह्या पोळ्याला काळी-पिवळी मारबत निघते. अनंत चतुर्दशीला पुन्हा ढोलताशा वाजतो आणि एरवी सुस्तावलेली गल्लीबोळ त्यावर बेभान थिरकू लागते.

काळी व पिवळी मारबत असे दोन प्रकार आहेत. चार दिवस तिची विधिवत स्थापना केली जाते. लहान मोठे सांस्कृतिक कार्यक्रम या निमित्ताने होतात. महाप्रसादाचे आयोजन केले जाते आणि तान्ह्या पोळ्याच्या दिवशी यांची मिरवणूक काढून दहन केले जाते. लहान मोठे सगळेजण मिरवणूक मार्गाच्या दुतर्फा उभे राहून मारबत व बडग्या बघतात.

या दिवशी नागपूर व जवळपासच्या गाव-खेडयातील लोकं नागपूरला आपल्या लहानग्यांना घेऊन येतात. आज या शेकडो वर्षांच्या परंपरेला टिकवून नागपूरची ओळख आणि वेगळेपण हे औचित्य साध्य झाल्यामुळे आजही टिकून आहे. ऐतिहासिक सोहळा नागपूर नगरीचा ठेवा अनेकांना कळावा यासाठी हा लेखन प्रपंच !

तान्ह्या पोळ्याला भल्या पहाटे उठून आमच्या लाकडी बैलांची डागडुजी आम्ही करून ठेवायचो. कारण सकाळी १० वाजेपासूनच मारबती सुरू व्हायच्या. आई तहान लाडू, भूक लाडू डब्यात बांधून द्यायची. उड्या मारतच नेहरू चौकात जाऊन मोक्याची जागा पकडायची. बोंबा मारत इतवारीच्या मोहल्ल्यांमधून या मारबती मिरवतात. सोबत बडगेही असतात.

डेंग्युले घिऊन जाय गें मारबत.....
बह्याडाले घेऊन जाय रे बडग्या... रस्त्याच्या दुतर्फा तोबा गर्दी असते. या गर्दीत हरवून विस्फारलेल्या डोळ्यांनी मारबत पाहणं म्हणजे वैदर्भीय संस्कृतीचा भव्य-दिव्य सोहळा अनुभवणं असतं.

नागपूरची मारबत प्राचीन संस्कृतीचे प्रतीक आहेच. त्याचबरोबर आपल्या सामूहिक सुख-दुखाःचा ती एक आश्वस्त हूंकार आहे. जेव्हा तिची लेकरं ईडा पिडा घेऊन जा गे मारबत अशी मनापासुन साद घालतात, तेव्हा ईडा-पीडा पोटात घेऊन ती माऊली धगधगत्या अग्नीला हसत हसत आलिंगन देते.

## एकमेकांत स्नेहबंध निर्माण व्हावेत

नागपूरकर भोसल्यांच्या शासनकाळात हा सण सुरू झाला. विदर्भात बहुधा सर्व ठिकाणी हा सण साजरा होतो. १७८९ मध्ये दुसरे श्रीमंत राजे रघुजी महाराज भोसले (द्वितीय) यांनी हा उत्सव सुरू केला. त्यांनी लहान मुलांना बैलांचे महत्त्व कळावे म्हणून हा उपक्रम हाती घेतला होता. राजे रघुजी महाराज भोसले (द्वितीय) यांनी लाकडी बैल तयार करून सर्व लहान मुलांना वाटले.

जिवंत बैलांप्रमाणे त्या बैलांना सजविण्यात आले. आंब्याचे तोरण लावून जिलेबी, फळे, चॉकलेट, बिस्किट पुडे अशा विविध वस्तू तेथे बांधण्यात आल्या. बैलाजवळ मुलांना उभे करून बैलांची पूजा केली जायची. पूजा संपल्यानंतर तोरण तोडून पोळा फोडून वाजत गाजत हनुमान खिडकीचे दर्शन घेऊन हनुमानाला नारळ फोडून परत आल्यावर मुलांना खाऊ, पैसे, वाटले जायचे. ही परंपरा सातत्याने सुरु होती. आजही नागपूरातील महाल परिसरात ती पहायला मिळते.

नागपूरसह विदर्भातील जवळपास सगळ्याच जिल्ह्यांमध्ये तान्हापोळ्या निमित्त सगळ्याच वयोगटातील लोक लाकडी बैल घेऊन त्याची पुजा करून हा सण आनंदाने साजरा करतात. त्यातच नागपुरातील सनियर भोसला पॅलेसमधील तब्बल आठ फुट उंचीचा लाकडी बैल सर्वांचे लक्ष वेधून घेतो. नागपूरातील या सणाला व लाकडी बैलांच्या (तान्हा) पोळ्याला तब्बल २३५ वर्षे पूर्ण होत आहेत. महाराष्ट्रात सर्वत्र पोळा हा बैलांचा सण म्हणून साजरा होतो. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे तान्हा पोळ्याला

शहरातील अनेक भागात लाकडी बैलांचा पोळा भरतो. विदर्भ वगळता कुठेच हा पोळा साजरा होत नाही.

लहान मुले मोठे बैल नेऊ शकत नाहीत. ते त्यांना आवरू पण शकत नाहीत. म्हणून त्यांच्या हौस-मजेसाठी ह्यतान्हा पोळा' साजरा करण्यात येतो. त्या दिवशी लहान मुले लाकडापासून तयार केलेला बैल घेऊन खऱ्या बैलाप्रमाणेच या लाकडाच्या बैलाचा तान्हा पोळा साजरा करतात. तान्हा पोळा बहुतेक लहान मुलांच्या विरंगुळ्यासाठी साजरा करण्याची प्रथा आहे. बैल पोळ्याच्या पाडव्याला नागपूरसह पूर्व विदर्भात तान्हा पोळा उत्साहात साजरा केल्या जातो.

ही ऐतिहासिक परंपरा असलेल्या या पोळ्याची सुरूवात राजे रघुजी भोसले यांनी केली होती. तेव्हा पासुन तान्हा पोळा साजरा करतात. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी साजरा होणारा तान्हा पोळा हा शहराचा अनोखा सण विदर्भाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा पुरावा आहे.

या दिवशी लहान मुले आपआपल्या लाकडी बैलाला सजवतात. त्यानंतर एखाद्या जवळच्या मंदिरात किंवा मैदानावर हा तान्हा पोळा भरवल्या जातो. तो परिसर फुगे, तोरण, पताका लावुन सजविल्या जातो. प्रसंगी महादेवाची गाणी वाजविली जातात. नंदी बैल भगवान महादेवाचे वाहन असल्या कारणाने महादेवाच्या नावाचा जयजयकार केल्या जातो. त्यानंतर मुलांना काकडी व खोबऱ्याचा प्रसाद वाटप केल्या जाते आणि पोळा फुटला असे जाहीर केल्या जाते.

गेल्या काही वर्षांपासुन या पोळ्याला संस्कृती व स्पर्धा याची झालर लागली आहे. अनेक पालक आपल्या मुलाला वेगवेगळ्या वेशभुषांमध्ये सजवुन आणतात. पोळा फुटायच्या आधी या सगळ्या छोट्या मुलांचे वेशभुषा निरीक्षण केले जाते. तसेच त्यांनी सजावुन आणलेल्या बैलाचे निरीक्षण केले जाते. पोळा फुटल्यानंतर उत्तम वेशभुषा व बैलाची उत्तम सजावट केलेल्या मुलांना क्रमांका प्रमाणे नंबर देऊन, त्यांना योग्य ते पारितोषिक दिल्या जाते. त्याचप्रमाणे सगळ्याच मुलांना काहीनाकाही छोटी भेटवस्तु दिली जाते. त्यानंतर ही मुले घरी येतात.

ज्याप्रमाणे मोठ्या बैलांची सर्व प्रथम घरी पुजा केल्या जाते. त्याचप्रमाणे या लाकडी बैलांच्या पूजेला देखील घरुन सुरुवात होते. त्यानंतर ही मुले आपल्या शेजारी व नातेवाईकांकडे जाऊन बोजारा जमा करतात, म्हणजे त्यांना पैसे किंवा भेटवस्तु दिल्या जाते.

लहान मुलांना देखील शेतीचे व त्यात राबराब राबणाऱ्या बैलांचे महत्व कळावे. आपल्या कृषीप्रधान संस्कृती विषयी ते कृतज्ञ राहावे, यासाठी कदाचित तान्हा पोळा हा सण साजरा करण्याची प्रथा विदर्भात रुजली असावी. यामुळे लहान मुलांमध्येही बैल या पशुधनाबाबत माहिती होऊन महाराष्ट्रीयन संस्कृती जपल्या जाते. सर्वांना तान्हा पोळ्याच्या हार्दिक शुभेच्छा !

---

# राष्ट्रीय अंतराळ दिवस

आज २३ ऑगस्ट, आजचा दिवस संपूर्ण भारतात राष्ट्रीय अंतराळ दिवस म्हणून संपूर्ण साजरा केला जातो. २३ ऑगस्ट हा दिवस भारताच्या अंतराळ इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेला कारण याच दिवशी भारताने चंद्रावर तिरंगा फडकावला.

या गौरवशाली घटनेची आठवण म्हणून देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय अंतराळ दिवस म्हणून घोषित केली. या ऐतिहासिक निर्णयामुळे भारतीयांच्या मनात या दिवसाची स्मृती कायमस्वरूपी कोरली गेली या महान दिवसाला आज दोन वर्ष पूर्ण होत आहे.

२३ ऑगस्ट २०२३ रोजी संध्याकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी भारताच्या चांद्रयान ३ ने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी लँडिंग केले आणि इतिहास घडला. चंद्रावर यशस्वीपणे यान उतरवणारा भारत हा जगातील चौथा तर दक्षिण ध्रुवावर उतरणारा पहिला देश बनला. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात भारताने चंद्रावर स्वारी केली यासारखी दुसरी आनंदाची गोष्ट नाही. भारताची ही चांद्र मोहीम चांद्रयान - ३ या नावाने ओळखली जाते.

याआधी भारताने दोनदा चंद्रावर पाऊल ठेवण्याचा प्रयत्न केला मात्र दुर्दैवाने तो अपयशी ठरला. २००८ साली चांद्रयान १ या मोहिमेस इस्त्रोने सुरवात केली त्यानंतर २०१९ साली चांद्रयान २ मोहिमेतील यान चंद्राच्या कक्षेत पोहचूनही सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर विसंगतीमुळे चंद्राच्या पृष्ठभागावर उतरविण्यास अपयशी ठरले होते. अर्थात चांद्रयान २ पूर्णपणे अपयशी ठरले असेही म्हणता येणार नाही.

कारण चांद्रयान २ मोहिमेवेळी पाठवलेले ऑरबीटर चंद्राच्या कक्षेत यशस्वीपणे कार्यरत होते. या ऑरबीटरवरील काही उपकरणे वापरून चंद्राच्या कक्षेतून पृथ्वीचा अभ्यास केला जात होता. तसेच चंद्र व त्याच्या वातावरणाविषयी नवी वैज्ञानिक माहिती अपल्याला मिळत होती.

चांद्रयान ३ हा आधीच्या म्हणजे चांद्रयान २ , मोहिमेचाच भाग होता. या मोहिमेत अपयश आले तेंव्हा यानाचा संपर्क तुटला म्हणून केवल संपर्क तुटा है.... हौसला नहीं! असे म्हणत देशातील १४० कोटी जनता शास्त्रज्ञांच्या पाठीशी ठामपणे उभी राहिली.

देशातील जनतेला देशातील शास्त्रज्ञांविषयी कमालीचा आदर आणि विश्वास आहे याच विश्वासाच्या बळावर आपल्या शास्त्रज्ञांनी चांद्रयान २ मोहिमेत आलेले अपयश विसरून नव्याने सुरवात केली. चांद्रयान २ मोहिमेच्या अपयशातून धडा घेत चांद्रयान ३ मोहिमेवेळी शास्त्रज्ञांनी पुरेपूर काळजी घेतली होती.

यानातील काही घटक ऐनवेळी कार्यान्वित होऊ शकले नाही तरी यान चंद्रावर यशस्वीपणे उतरेल अशी नव्या यानात रचना करण्यात केल्याची माहिती इस्त्रोचे संचालक एम सोमनाथ यांनी दिली होती.

सेन्सर निकामी होणे, इंजिनमध्ये बिघाड होणे, संगणकातील नियमसंच व गणितीय प्रक्रिया यात होणाऱ्या चुकांची तपासणी करून त्याचे निराकरण करणे यासारख्या बाबींचा विचार करूनच हे यान चंद्रावर झेपावले होते त्यामुळे यावेळी चंद्रयान ३ यान चंद्रावर यशस्वीपणे उतरेलच असा विश्वास देशातील १४० कोटी जनतेला होता.

इस्त्रोच्या शास्त्रज्ञांनी अखेर हा विश्वास सार्थ ठरवला. चांद्रयान ३ मोहीम ही भारताच्या दृष्टीने अतिशय महत्वाची होती. भारताचे हे यान चंद्रावर उतरल्याने चंद्रावर यान उतरवण्यात यशस्वी ठरलेल्या काही मोजक्या देशात भारताचा समावेश झाला.

या मोहिमेद्वारे आपल्या देशातील विकसीत तंत्रज्ञान जगाला दाखवण्याची संधी मिळाली. अंतराळ तंत्रज्ञान व उद्योग यांची सांगड घालून अर्थव्यवस्थेला गती मिळाली. ही मोहीम यशस्वी झाल्याने भविष्यात चंद्रावर मानव पाठवण्याचे स्वप्न साकार होईल. ही मोहीम यशस्वी झाल्याने भारत अंतराळ क्षेत्रात एक महासत्ता म्हणून उदयास आली.

एकूणच भारताच्या अंतराळ क्षेत्रात चांद्रयान ३ मोहीम हा मैलाचा दगड ठरली. आपल्या शास्त्रज्ञांनी ही मोहीम यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेतली होती. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी शास्त्रज्ञांनी रात्रीचा दिवस केला. त्यांच्या या मेहनतीला अखेर यश मिळाले आणि आपली ही चांद्रयान ३ मोहीम यशस्वी झाली.

चंद्रावर तिरंगा फडककवून भारताने जगाला दाखवून दिले की अंतराळ क्षेत्रात भारत महासत्ता म्हणून उदयास येत आहे. ७८ वर्षांपूर्वी जेंव्हा भारत इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त झाला तेंव्हा भारत सुईचे टोकही बनवू शकणार नाही अशी आपली हेटाळणी केली जायची. जो देश सुईचे टोकही बनवू शकत नव्हता त्या देशाने आज चंद्रावर स्वारी केली आहे हे भारताच्या आजवरच्या सर्व शास्त्रज्ञांचे आणि सरकारचे यश आहे.

या यशाचा देशातील १४० कोटी देशवासीयांना सार्थ अभिमान आहे. चंद्रावर तिरंगा फडकावून अंतराळ क्षेत्रात महासत्ता होण्याच्या दृष्टीने पाऊल टाकणाऱ्या सर्व भारतीयांना राष्ट्रीय अंतराळ दिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

## बाप्पांचे स्वागत करूयात

**वाचक लिहितात**

लवकरच गणेशोत्सवाच्या निमित्ताने श्री गणेशाचे आगमन होणार आहे. गणपती हे सर्वांचे आराध्य दैवत आहेत. गणपतीच्या आगमनाची लहान-थोर सर्वजण आतुरतेने वाट पाहत असतात. गणेशोत्सवापूर्वी सर्वांची श्री गणेशाच्या स्वागतासाठी लगबग सुरू होते. सजावट कशी करायची? कोणता देखावा उभा करायचा? श्री गणेशाच्या आवडीचे नैवेद्य त्याला दाखवण्यासाठी गृहिणींची पण तयारी सुरू होते. श्री गणेशाचे आगमन होण्यापूर्वी घरातील स्वच्छतेला सुरुवात होते. घराचा कानाकोपरा स्वच्छ करण्यासाठी, जाळी-जळमटे, अडगळ काढण्यासाठी घरातील सर्व मंडळी तत्परतेने पुढाकार घेतात. परंतू श्री गणेशाचे स्वागत करण्याआधी आपण आपले मन शुद्ध, स्वच्छ, निर्मळ आणि पवित्र करायला हवे. कारण श्री गणेशाला असेच मन आवडणार आहे. हे लक्षात घेऊन आपल्या मनाचा कानाकोपरा स्वच्छ करायला हवा. मनामध्ये साठलेली जाळी-जळमटे, दोष-अहं यामुळे आपल्यावर आलेले आवरण हे सर्व साफच करायला हवे. कारण मनामध्ये असलेली ही एक प्रकारची अडगळच आहे आणि हे बाप्पाला आवडणार नाही हे लक्षात घेऊन आधी आपले मन आपण साफ करायला हवे. कारण अशा मनामध्येच श्री गणेशाचा वास असतो. अशाच मनामध्ये त्याला राहायला आवडते. आपल्या हृदयमंदिरामध्ये श्री गणेशाची स्थापना करण्यापूर्वी आधी आपले मन शुद्ध, निर्मळ, पवित्र करूयात.

■ **मनिषा बोराटे, सातारा.**

## केवळ १४ दिवस खा मेथीच्या बिया

भारतीय स्वयंपाक घरात अनेक प्रकारच्या बियांचा वापर मसाला म्हणून केला जातो. यातील अनेक बिया औषधी गुणांनी भरपूर आहेत. त्यापैकी मेथी हे असेच गुणकारी आहे. याचा वापर आयुर्वेदिक मेडिसिन म्हणून केला जातो. आज आपण पाहाणार आहोत की जर तुम्ही सलग १४ दिवस मेथीच्या बियांचे सेवन केले तर तुमच्या शरीरात काय बदल पाहायला मिळतील.

मेथीची बिया आणि त्याची पाने देखील आरोग्यासाठी लाभदायक आहेत. बिया आणि पानांचे सेवन केल्याने आरोग्याला अनेक प्रकारचे लाभ मिळतात. आयुवेर्दानुसार मेथीचा स्वाद कडू असतो. मेथी उबदार असल्याने शरीरात उष्णता तयार करते. ज्यांना कफ आणि वात असेल तर नियंत्रित करते. मेथीने पित्त वाढते, त्यामुळे ज्यांना पित्ताचा त्रास आहे त्यांनी याचे सेवन तूपासोबत करावे.

मेथीच्या बियात सॉल्युबल फायबर असते ते तुमच्या ब्लड शुगरला कंट्रोल करते. आणि कार्बोहायड्रेट्सचे अवशोषण प्रक्रीया संथ करते. हे डायबिटीज वा इन्सुलिन रेजिस्टेंन्सवाल्या लोकांना खूपच फायदेशीर आहे. मेथी पचन एंजाईम्सला उत्तेजित करते. त्यामुळे अपचन आणि पोट फुगणे सारख्या समस्या कमी होतात. मेथी कोलेस्ट्रॉलचे शोषण देखील रोखते.,ज्यामुळे हार्ट डिजीसचा खतरा घटतो.

**वजन कमी करण्यास फायदा**

वजन नियंत्रण करण्यासाठी मेथी उपयोगी आहे.



कारण यात फायबर जास्त असते त्यामुळे भूक कमी होते. ब्रेस्टफिड करणाऱ्या मातांसाठी मेथी दूध वाढवण्यास सहायक असते. मेथीची पाने देखील एंटीऑक्सीडेंट्स, विटामिन्स आणि इंफ्लेमेशन कमी करणाऱ्या गुणांनी भरपूर असतात.


**सकाळी रिकाम्या पोटी मेथीचे पाणी**

मेथीच्या सेवनासाठी तुम्ही रात्री एक चमचा बिया पाण्यात भितवत ठेवा आणि सकाळी रिकाम्या पोटी पाणी प्या. तुम्ही बिया देखील चावून खाऊ शकता. पाण्यासोबत बिया गिळूही शकता. चावणे आवडत नसेल त्यांनी गिळाव्यात. या बियांना सलाड , करी वा डाळीत टाकू शकता. जर खुप वेळ भिजवले तर मेथीतून कोंब येतात. ते सलाड किंवा सपूमध्ये टाकू शकता.

मेथीचे दाणे मर्यादित प्रमाणात खावेत. एडल्टसाठी ५ ते २० ग्रॅम पुरेसे आहेत. काही लोकांना पोटात त्रास किंवा अलर्जी असू शकते. डायबिटीजचे औषधे घेणाऱ्यांनी थोडी सावधानता बाळगावी. ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### नाही कसं म्हणता?

**अनाठायी योजनांवर**
**खर्च करता करोडात**
**आपत्तीत अन्नदाता फसला**
**हे न समजणे इतपत का**
**खरच तुम्ही दुधखुळे आहात?**

**योग्य वेळी धाऊन आले**
**तर मदत लागते सत्कारणी**
**वराती मागुन घोडे**
**तुम्हीच सांगा काय कामी ?**

**आत्महत्या केल्यावर द्याल ही**
**तुम्ही लाखाची मदत, पण**
**बुंदसे गयी तो**
**हौदसे नही आती**
**हे कां तुम्हाला नाही समजत ?**

# रोगराई, महागाई व भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन जा गे मारबत!

मारबत उत्सव ही नागपूरच्या इतिहासातील मोठी आणि ऐतिहासिक परंपरा आहे. मारबत उत्सवाची सुरूवात इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली.

यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरूध्द मोठा लढा उभा करणे. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट चालीरितीचा व वाईट रूढींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दीष्ट ठरले. येणारे विघ्न दुर करण्यासाठी १८८० मध्ये काळ्या मारबतीची सुरूवात झाली. यानंतर १८८४ मध्ये पिवळ्या मारबतीची सुरूवात झाली. आज काळ्या मारबतीला १४५ तर पिवळ्या मारबतीला १४० वर्षे पूर्ण होत आहेत. दोन्ही मारबती मांडण्या मागचा एकच उद्देश होता आणि आहे तो म्हणजे येणारे विघ्न, रोगराई, महागाई, दुष्काळ, भ्रष्टाचार दूर व्हावा. नागपूरसाठी आश्चर्याची गोष्ट म्हणजे १४५ वर्षे जुनी परंपरा त्याच पद्धतीने पार पाडल्या जाते.

या उत्सवात सर्व धर्माचे लोक आनंदाने सहभागी होतात. त्याहीवेळेस मारबतीची सलग आठ दिवस पुजा-अर्चना व्हायची आणि आताही होते. सांस्कृतिक कार्यक्रम सुध्दा होतात. असेही सांगण्यात येते की मारबत ही नवसाला पावणारी असल्याची अनेकांची श्रद्धा आहे. मारबतीच्या दर्शनासाठी अनेकजन नवजात शिशूचे तोंड मारबतीच्या स्तनाला लावण्याची देखील प्रथा आहे. त्यामुळे काळ्या मारबतीचा व पिवळ्या मारबतीला पारंपरिक पद्धतीने महत्त्व दिले जाते. मारबतीचा सन पोळ्याच्या पाडव्याला म्हणजे तान्हया पोळ्याच्या दिवशी भव्य मिरवणूक काढून येणाऱ्या विघ्नांच्या विरोधात जय घोष करून ईडा-पीडा,माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत.... अशा घोषणा दिल्या जातात.

अमावस्येला घरोघरी मेड्यांच्या (पळसाचे) फांद्यांची पुजा केली जाते व दुसऱ्या दिवशी पाडव्याला पळसाच्या फांद्यांचे दहन केले जाते. कालांतराने भ्रष्ट व कलंकित नेता किंवा भ्रष्टाचारी लोकांच्या विरोधात त्याची प्रतिकृती बडगा काढून निषेध केला जातो. महागाई, अत्याचार, आतंकवाद, महामारी, बँक घोटाळे इत्यादींच्या विरोधात बडग्याच्या रूपात प्रतिकृती काढून निषेध नोंदविला जातो. पिवळ्या व काळ्या मारबतीच्या रूपाने आज अनेक विघटनकारी शक्तीचा, अत्याचाराचा विरोध करून समाजात जनजागृती करण्याची काळ्या व पिवळ्या मारबतीपासूनच परंपरा मिळाली आहे . राजकीय पुढारी, अत्याचारी, भ्रष्टाचारी कोणते घृणास्पद कार्य करतात हे बडग्याच्या रूपात पहायला मिळते. यामुळे समाजात जनजागृती निर्माण होते. म्हणजेच मारबत हा सन समाज जागृतीचा मोठा दिवस असल्याचे मी समजतो.

१८९७ मध्ये प्लेगची साथ आली होती. त्यानंतर १९२८ मध्ये नागपूरात इंग्रजांनी हिंदू-मुस्लिम दंगली घडविल्या. तरीही मारबत उत्सवाला कुठेही तडा जाऊ दिला नाही, ही नागपूरसाठी स्वाभिमानाची बाब आहे. करोना महामारीच्या काळात पहिल्यांदाच मारबत उत्सवातील मिरवणुकीत विघ्न निर्माण झाले. समाजातील वाईट गोष्टींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे मारबत उत्सव या सणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

मारबत उत्सवात बडग्यांची भूमिका मोलाची असते कारण बडगे हे देशातील विघातक गोष्टींचा निषेध नोंदविणारे असतात. यावर्षी मिरवणुकीत आपल्याला अनेक बडगे पहायला मिळतील . यात महागाई, सिलेंडरची दरवाढ, पेट्रोल दरवाढ, शहरातील खड्डे,



पाकिस्तान, चीन, आतंवाद, घोटाळेबाज, भ्रष्टाचारी, अत्याचारी, बेरोजगारी याविरोधात बडग्यांच्या माध्यमातून लोकांचा आक्रोश दिसून येईल.

मारबत उत्सवाची सुरूवात नागपूर मधून झाली. परंतु आता मारबत उत्सव महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात साजरा केल्या जातो. आज मारबत उत्सवाच्या निमित्ताने देशात होणारे अत्याचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, महागाई, वाढता भ्रष्टाचार यांच्या विरोधात समाजाने एकत्रित येण्याच्या उद्देशाने देशातील अनेक राज्यांनी नागपुरची परंपरा अंगीकारून समाजात सर्वसामान्यांवर होणारा अत्याचार जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहावा या उद्देशाने मारबत उत्सवाच्या दिवशी प्रतिकात्मक पुतळ्याचे बडगे काढून विरोध प्रगट केल्या जातो.

देशातील भ्रष्टाचाऱ्यांनी देशाला इतके पोखरून टाकले आहे की इंग्रजांनाही मागे टाकले आहे. देशात महागाई, बेरोजगारी वाढली आहे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढीस लागल्या आहेत . सर्वसामान्यांचे व गरीबांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे. त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांना सर्वप्रथम घेऊन जा गे मारबत!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

# जमिनीच्या वादात एकतर्फी कारवाई केल्याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक निलंबित

## जमिनीच्या व्यवहारात सुरक्षा रक्षकावर खोटा गुन्हा; जमिनीचा ताबा देण्याचाही प्रकार

**वसई, दि. २२ : प्रतिनिधी**

वसई विरार परिसरातील अनधिकृत बांधकामे आणि जमिनीच्या वादात मोठा आर्थिक फायदा होत असल्याने पोलीस अधिकाऱ्यांना अधिकचा रस असल्याचेच चित्र पहावयास मिळते. अशाच एका प्रकरणात थेट जागेवर जाऊन मूळ जमीन मालकाच्या सुरक्षा रक्षकाला ताब्यात घेऊन जागेवर असलेला कंटेनर काढून बोगस कागदपत्रे असलेल्या व्यक्तीला देणे वालीव पोलीस ठाण्यातील वादग्रस्त पोलीस उपनिरीक्षक संदेश राणे यांच्या अंगलट आले. याप्रकरणी आलेल्या तक्रारीची शहानिशा केल्यावर पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांच्या निर्देशानुसार संदेश राणे यांना निलंबित करण्यात आले आहे.

मुंबईतील खार येथे राहणाऱ्या दीपक गामी यांची वसई पूर्वेकडील गोखिवरे येथे सर्व्हे क्रमांक २२/३, २३/५ येथे मालकी जमीन आहे. या जमिनीवर सुशील जैन याने दावा सांगितल्याने वाद सुरू होता. सुरक्षेच्या कारणावरून गामी यांनी या जागेवर कंटेनर ठेवला होता. तसेच एक सुरक्षारक्षक नेमला होता. दीपक गामीच्या ताब्यातून जमिन मिळवण्यासाठी सुशील जैन याने वालीव पोलीस ठाण्यातील वादग्रस्त पोलीस उपनिरीक्षक संदेश राणे यांना हाताशी धरले. त्यानुसार संदेश राणे यांनी आपल्या साथिदार पोलिसांसह थेट जागेवर जाऊन त्या जागेवरील कंटेनर काढून टाकला. सुरक्षा रक्षकाला बेकायेदशीरपणे पोलीस ठाण्यात आणले. तसेच या जमिनिचा ताबा संदेश राणे यांनी जैन याला देऊन टाकला. इतकेच नाही तर गामी यांची मालकी जमीन असताना जैन याच्या खोट्या तक्रारीवरून राणे यांनी उलट गामी यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता.



याप्रकरणी गामी यांनी पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांची भेट घेऊन या प्रकरणाची माहिती दिली. कौशिक यांनी तक्रारीची गंभीरपणे दखल घेत चौकशी सुरु असता अनेक धक्कादायक माहिती उजेडात आली. जैन यांच्या तक्रारीवरून कृत्य करताना राणे यांनी स्टेशन डायरीत देखील नोंद केली नसल्याचे आढळले. सिव्हिल प्रकरणात हस्तक्षेप करून बेकायदेशीरपणे जागेचा जाबा दुसऱ्या व्यक्तीला मिळवून दिल्याचा ठपका राणे यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

अतिरिक्त पोलीस आयुक्त दत्रात्तय शिंदे यांनी राणे यांच्या निलंबनाच्या आदेशात अनेक बाबींचा खुलासा केला आहे. .दिपक अंबावी गामी यांनी जमिनीवर सुरक्षेच्या दृष्टीने ठेवलेला एक कंटेनर व जमिनीची देखरेख करण्यासाठी नेमलेला सुरक्षा रक्षक यांना सुशील फुटरमल जैन यांच्या खोट्या तक्रारीवरुन अर्जदार दिपक अंबावी गामी यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. सदर तक्रारीवरुन आपण अर्जदार दिपक अंबावी गामी, यांच्या सुरक्षा रक्षकाला पोलीस ठाणे येथे घेवून गेला आणि कंटेनर काढून रस्त्यावर आणून ठेवला. तसेच अर्जदार यांच्या जमिनीचा ताबा सुशील फुटरमल जैन यांना दिला. अर्जदार दिपक अंबावी गामी, यांचेकडे सदर जमिनीचे सर्व मालकी हक्क असतांनाही, सर्व कागदोपत्री पुरावे जोडलेले असतांनाही, आपण अर्जदार यांचे काहीएक न ऐकता जोरजबरदस्तीने जमिनीचा ताबा सुशील फुटरमल जैन यांना दिला असल्याचा ठपका संदेश राणे यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

संदेश अनंत राणे, आपणास कायद्याचे उत्तम ज्ञान असतांनाही तुम्ही सदरचे प्रकरण गांभीर्याने हाताळणी करणे आवश्यक होते. तुमच्या अशा वर्तनामुळे सामान्य जनतेच्या मनामध्ये पोलीसांप्रती अविश्वासाची भावना निर्माण होवून पोलीस दलाची प्रतिमा मलिन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तुमच्या अशा वर्तनामुळे नागरिकांमध्ये पोलीस विभागाच्या कार्यपध्दतीबाबत चुकीचा संदेश जाण्याचीही शक्यता नाकारता येत नाही, असा गंभीर ठपकाही ठेवण्यात आला आहे.

परिणामी पोलीस उपनिरीक्षक संदेश अनंत राणे, यांना महाराष्ट्र शासन गृहविभाग, अधिसुचना क्र. एमआयएस/१९१०/ प्र.क्रं. १८५/पोल-६अ, दि.१२ जानेवारी २०११ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम २५ अन्वये प्राप्त अधिकारानुसार व महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील नियम ३ च्या पोटनियम १ चा खंड(अ-२) व (१-अ)(एक)(अ) नुसार सदर आदेश स्विकारल्या दिनांकापासुन शासकीय सेवेतून निलंबित करण्यात येत आहे आणि ते पुढील आदेश काढले जाईपर्यत निलंबित राहतील, असे निलंबनाच्या आदेशात म्हटले आहे.

दरम्यान, संदेश राणे गेल्या काही वर्षांपासून वसई विरार परिसरातील विविध पोलीस ठाण्यात कार्यरत असून प्रत्येक ठिकाणी त्यांची कारकिर्द वादग्रस्त राहिली आहे. अनधिकृत बांधकामप्रकरणात एकतर्फी कारवाई करण्याचे आरोप त्यांच्यावर यापूर्वी झाले आहेत. तर विद्यापीठाचे बोगस पदवीप्रकरण, मद्य घोटाळा प्रकरणातही त्यांची चौकशी सुरू आहे.

# गणेशोत्सवापूर्वी शिक्षक कर्मचाऱ्यांना वेतन द्या

## शिक्षक भारती संघटनेची मागणी

**वसई, दि. २२ : प्रतिनिधी**

राज्यात दि. २७ ऑगस्ट रोजी श्रीगणेशाचे आगमन होत आहे. गणेशोत्सव महाराष्ट्रातील मोठा सण असून उत्साहाने, आनंदाने साजरा केला जातो. गणपती सणानिमित्त शाळा व महाविद्यालयांना पाच दिवसाची सुट्टी आहे. सण असल्यामुळे पगार गणपतीपूर्वी होणे आवश्यक आहे. तसेच दि. १ जानेवारी २०२५ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीतील महागाई भत्त्याची थकीत रक्कम, ऑगस्ट २०२५च्या वेतन देण्याबाबत शासनाने यापूर्वीच मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे शासनाने तातडीने निधीची उपलब्धता करून द्यावी अशी मागणी शिक्षक भारीत संघटनेचे कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी केली आहे.

शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिलेखे ३० ऑगस्ट २०२५ पर्यंत डिजिटलाईज करण्याची मुदत दिलेली आहे. अभिलेखे अपलोड न झाल्यास शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे ऑगस्ट पेड इन सप्टेंबर महिन्याचे वेतन आणि महागाई भत्त्याची थकबाकीची बीले जमा केली जाणार नाही, असे शिक्षण विभागाकडून सांगितले जात आहे. तसे झाल्यास गणपती सणापूर्वी वेतन मिळणे शक्य होणार नाही, अशी माहिती सुभाष मोरे यांनी दिली.

# म्हाडा परिसरातील कार्यकर्ते शिवसेनेत

**वसई, दि. २२ : प्रतिनिधी**

विरार पश्चिमेतील म्हाडा संकुल भागातील अनेक प्रमुख कार्यकर्त्यांनी औपचारिकरित्या शिवसेना मुख्य नेते , एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना पक्षात प्रवेश केला. वसई तालुकाप्रमुख सुदेश चौधरी यांनी सर्व कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत केले. शिवाजी कल्याणकर, संतोष शिर्के, रमाकांत बारवाड, रोहित कुमार, सुनील हळदणकर, शैलश तेंडुलकर, उत्तम संकपाळ, श्याम राणे, विजय धुरी, संतोष महाडिक, प्रशांत काळबांडे, अनिकेत कांबळी, जनार्दन जडियार, विजय नाईक, पाटील, किरबा पवार, प्रभाकर दोडेकर, योगेश पाटोळे, देवेंद्र टेंभुळकर,



अमित सावे यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला आहे. नव्या कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे विरार पश्चिम म्हाडा संकुल परिसरात शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक वाढली असून, येणाऱ्या काळात जनतेच्या प्रश्नांवर अधिक जोमाने काम होईल, असा विश्वास तालुकाप्रमुख सुदेश चौधरी यांनी व्यक्त केला आहे. म्हाडा परिसरात शिवसेना पक्षाची शाखा सुरू करून जनतेचे प्रश्न सोडवले जातील, असे यावेळी कल्याणकर व इतर पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# सुरक्षारक्षकाचा पुराच्या पाण्यात बुडून मृत्यू

**वसई, दि. २२ : प्रतिनिधी**

नालासोपारा येथील डीमार्ट परिसरातील पुराच्या पाण्यात गुरुवारी एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. राजेश तिवारी असे या मृत व्यक्तीचे नाव आहे. ते नालासोपारा नालासोपारा पूर्वेला राहत होते.

पश्चिमेच्या डिमार्टजवळच्या हनुमान नगर भागात पुराचे पाणी साचून राहिले आहे. गुरुवारी दुपारच्या सुमारास याच पाण्यात एक मृतदेह वाहून आल्याचे आढळले होते. याची माहिती मिळताच नालासोपारा पोलिसांनी घटनास्थळी पोहचून मृतदेह ताब्यात घेतला. मात्र रस्त्यात पाणी साचल्याने शववाहिनी पोहोचणे शक्य नव्हते. अशावेळी मृतदेह जेसीबीच्या मदतीने ट्रॅक्टरमध्ये टाकून रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला.

तिवारी हे हनुमान नगर परिसरात सुरक्षारक्षक म्हणून काम करत होते. पुराच्या पाण्यात पडल्याने त्यांचा मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# अतिवृष्टीने भातशेतीचे मोठे नुकसान

**वाडा, दि. २२ : प्रतिनिधी**

पालघर जिल्हयात गेले आठ दिवस सतत मुसळधार कोसळणाऱ्या पावसामुळे सर्वत्रच पुरपरिस्थिती निर्माण झाली होती. यात शेतकऱ्यांसह अनेक नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. नदी,नाले, ओहोळ तुडूंब भरून दुथडी भरून वाहत असल्याने येथील जनजीवन पुर्णत: विस्कळीत झाले होते. भात लागवड केलेल्या शेतजमिनीला अक्षरश: पुराने विळखा घातला होता. आठ दिवस शेतजमीन पाण्याखाली राहील्याने अनेक शेतकऱ्यांच्या भातशेतीचे मोठे नुकसान झाले आहे.या अतिवृष्टीचा वाईट परिणाम भातशेतीवर मोठ्या प्रमाणात झाला असून अनेक शेतकऱ्यांची भात लागवड कुजून वाया गेली आहे. शासनाने नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत अशी मागणी शेतकरी करीत आहेत. पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्याची भाताचे कोठार म्हणून ओळख आहे. येथील वाडा कोलम हा देशात प्रसिद्ध आहे. अनेक संकटांवर मात करून येथील शेतकरी हा आपली शेती करीत आहे. मात्र या अतिवृष्टीत भातशेतीचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत अशी मागणी शेतकरी अशोक पाटील (पासोरीपाडा) यांनी केली आहे.

# मराठा समाजप्रश्नी मंत्रिमंडळ उपसमितीची पुनर्रचना

## राधाकृष्ण विखे- पाटील समितीचे नवे अध्यक्ष

**मुंबई, दि. २२ : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीवर आंदोलक मनोज जरांगे यांनी येत्या २९ ऑगस्टला मुंबईत आंदोलनाची हाक दिली असताना राज्य सरकारने शुक्रवारी मराठा समाजाच्याप्रश्नी मंत्रिमंडळ उपसमितीची पुनर्रचना केली आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे या उपसमितीचे अध्यक्षपद सोपविण्यात आले आहे. मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक स्थितीबाबत तसेच इतर संलग्न बाबींवरील शिफारशींवर ही समिती कार्यवाही करणार आहे.

गेल्या वर्षी पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीनंतर मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. त्यांनी येत्या २९ ऑगस्टला मुंबईत आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर सामान्य प्रशासन विभागाने आज मंत्रिमंडळ उपसमितीबाबतचा शासन निर्णय जारी केला.

या समितीत उच्च आणि तंत्र शिक्षण



मंत्री चंद्रकांत पाटील, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे , उद्योगमंत्री उदय सामंत, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे, मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील आणि सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा समावेश आहे. तर सामान्य प्रशासन विभागाचे सचिव यांची समितीच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

मराठा आरक्षण विषयक प्रशासकीय आणि वैधानिक कामकाजाचा समन्वय ठेवणे, न्यायप्रविष्ठ प्रकरणांमध्ये सरकारची बाजू मांडण्यासाठी नेमलेल्या समुपदेशींशी समन्वय ठेवणे, न्यायालयाने दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्याबाबत कार्यपद्धती ठरवणे, मराठा समाजाच्या कुणबी नोंदी शोधून त्यांना दाखले देण्यासाठी नेमलेल्या समितीचे अध्यक्ष आणि निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीशी समन्वय राखणे, मराठा आंदोलक तसेच शिष्टमंडळाशी चर्चा करणे, जातप्रमाणपत्र देण्यात येणाऱ्या अडचणीबाबत निर्णय घेऊन प्रक्रिया सुरळीत करण्याबाबत कार्यवाही करणे अशी कार्यपद्धती या उपसमितीला ठरवून देण्यात आली आहे.

**आज का अंदाज**

शनिवार २३ ऑगस्ट २०२५

**पत्थर फोड एकच**

कल्याण बाजार

१ ४ ७ ८

२९० १४९ २५० २६०
३९० २४८ ३६८ ३५०
४७० ३४७ ४६७ ४४०

१० ४० ७३ ८३
१२ ४२ ७५ ८५
१६ ४६ ७९ ८९

**२३ ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी**

२१ ३१ ६० ९०
२५ ३५ ६४ ९४
२७ ३७ ६८ ९८

१४७ २३८ १५० २३४
३९० ५८० २५९ ४५०
४८० ३०० ३५८ ४६०

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# ऑनलाईन अर्ज करताना कागदपत्रांबाबत दक्षता बाळगा : मिलिंद नारिंगे

'महाज्योती'च्या संकेतस्थळावर सूचना फलक (नोटीस बोर्ड) या पर्यायात जाऊन एसएससी-सीजीएल, एमईएस, आयबीपीएस-(पीओ) आणि एलआयसी (एएओ)-२०२५-२६ ला भेट द्यायची आहे. यानंतर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरता येणार. तसेच अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे स्वाक्षांकीत करुन स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावे. सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतरच विद्यार्थ्यांचा अर्ज हा स्वीकृत होणार. तसेच पात्र झालेल्या विद्यार्थ्यांची पडताळणी परीक्षा घेऊन प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येणार, अशी माहिती सुद्धा व्यवस्थापकीय संचालक श्री. मिलिंद नारिंगे यांनी सांगितले. इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करतांना आधार कार्ड, जातीचा प्रमाणपत्र, वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, १२ वी उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, पदवी उत्तीर्ण गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र, पदव्युत्तर उत्तीर्ण गुणपत्रक किंवा पदव्युत्तरच्या शेवटचा वर्षाचे प्रमाणपत्र आणि दिव्यांग असल्यास ४० टक्के पेक्षा जास्त प्रमाणात असलेल्या दिव्यांगत्वाचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला असेही 'महाज्योती'तर्फे कळविण्यात आले आहे. प्रशिक्षणाबाबतचे सर्व तपशील, निकष, अटी व शर्ती तसेच अर्ज करण्याची सविस्तर प्रक्रिया याबाबतची माहिती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदरचे प्रशिक्षण हे नामांकित प्रशिक्षण संस्थांमार्फत देण्यात येणार असून प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची निवड ही प्रवेश परीक्षा घेऊन करण्यात येत आहे. प्राप्त झालेल्या गुणांकाच्या आधारे मेरीटच्या आधारे निकषांनुसार अंतिम निवड करण्यात येणार आहे. महाज्योतीच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात येत्या ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज भरायचा आहे. तसेच अधिक माहितीसाठी ०७१२- २८७०१२०/१२१ या क्रमांकावर संपर्क करावे. या प्रशिक्षणाचा मोठ्या प्रमाणात 'महाज्योती'च्या विद्यार्थ्यांनी घ्यावे असे आवाहनही महाज्योतीचे संचालक मिलिंद नारिंगे यांनी केलेले आहे.

# राशीभविष्य

**मेष :** मन आज थोडे अस्थिर राहू शकते. दिवसाची सुरुवात व्यायाम करून करा, जेणेकरून तुम्ही शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या फिट राहाल. आर्थिक नियोजन करणे महत्त्वाचे आहे, नाहीतर बजेट बिघडू शकते.

**वृषभ :** आज छोट्या गोष्टींना जास्त महत्त्व देऊ नका. आज एखाद्या जवळच्या व्यक्तीसोबत वाद होण्याची शक्यता आहे. हा वाद कोर्ट-कचेरीपर्यंत पोहोचू शकतो. त्यामुळे वाद घालणे टाळा.

**मिथुन :** संवेदनशील स्वभावामुळे तुमच्या जवळच्या मित्राला त्रास होऊ शकतो. कुटुंबाचे तुम्हाला पूर्ण सहकार्य मिळेल. तुमची आर्थिक स्थिती चांगली राहील. तुमच्या व्यवसायात वाढ होण्याची शक्यता आहे.

**कर्क :** कामाच्या ठिकाणी तुम्हाला तुमचे कौशल्य दाखवण्याची संधी मिळेल. जोडीदारासोबत चांगला वेळ घालवाल. खर्च वाढण्याची शक्यता आहे. वडिलांचे सहकार्य मिळेल. आरोग्याला जपा.

**सिंह :** आज राग आवरणे गरजेचे आहे. नोकरीमध्ये तुम्हाला प्रगतीची संधी मिळेल. तुमची कमाई वाढेल. पण त्यासोबतच खर्चही जास्त असेल. कुटुंबाचे पूर्ण सहकार्य मिळेल. त्यांच्या आरोग्याची काळजी घ्या.

**कन्या :** मनात आज विचारांचे चढ-उतार सुरू राहतील. तुमचे मन अभ्यासात जास्त रमले जाईल. शैक्षणिक कामांमध्ये तुम्हाला यश मिळेल. समाजात तुमचा मान-सन्मान वाढेल. बौद्धिक कामांमधून उत्पन्न वाढेल.

**तुळ :** आज तुम्हाला तुमच्या कामाच्या ठिकाणी सकारात्मक वातावरणात काम करायला मिळेल आणि सहकाऱ्यांशी तुमचे संबंध चांगले राहतील. आज तुम्ही एक नवीन काम सुरू कराल, ज्यामध्ये यश मिळेल.

**वृश्चिक :** स्वभावात बदल जाणवू शकतो, पण दिवसाच्या शेवटी सर्व काही सामान्य होईल. तुमची आर्थिक आणि व्यावसायिक स्थिती चांगली राहील. कुटुंबासोबत प्रवासाचा योग आहे.


**धनु :** आज आत्मविश्वास चांगला राहील, पण पैशांच्या स्थितीवरून तुमच्या मनात काही चढ-उतार असू शकतात. शैक्षणिक कामांमध्ये तुम्हाला नक्कीच यश मिळेल. समाजात तुम्हाला मान-सन्मान मिळेल.

**मकर :** आज तब्येत चांगली राहील. कामाच्या ठिकाणी तुम्हाला एखादे महत्त्वाचे प्रोजेक्ट सोपवले जाऊ शकते. तुमच्या व्यापारिक स्थितीत सुधारणा होईल. यामुळे तुम्हाला अनपेक्षित फायदा होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** नोकरीमध्ये बदल आणि प्रगतीची संधी मिळेल. उत्पन्न वाढेल, पण कामाच्या ठिकाणी बदल होण्याची शक्यता आहे. आजचा दिवस रोमँटिक संबंधांसाठी चांगला नाही. प्रकृतीकडे लक्ष पुरवा.

**मीन :** कोणताही निर्णय घाईत घेऊ नका. प्रियकर किंवा प्रेयसी तुमच्याकडून काहीतरी खास अपेक्षा ठेवू शकतो, त्यामुळे त्यांना निराश करू नका. तुमच्या जोडीदाराकडून एखादे सरप्राईज गिफ्ट मिळण्याची शक्यता आहे,

# शब्दकोडे क्रमांक २१९९



**आडवे शब्द :-**
१) मोठे भांडण
४) माल साठवून चढ्या भावाने विक्री करणारा
७) विश्वासघातकी
११) भूतकाळ
१३) जंगलातील वाट
१४) अवधान, चित्त
१५) ** तलवार
१६) बांबू
१७) यज्ञ, यज्ञात टाकण्याची आहुति
१८) मनाला टोचणारे दु:ख
१९) कोलाहल, मोठा कल्ला
२०) दर्पण
२१) उपकार
२२) घसा
२३) विश्रांती
२५) प्रतिदिनी
२७) घागरा
२९) विणकराचे उपजिविकेचे साधन
३१) कर्ज देणारा
३३) रात्री चमचमणारा किटक
३५) गर्दभ
३७) कृष्णसखी
३८) अमावस्या
४०) द्रव पदार्थ
४१) अंगातील जोम
४२) उगवत्या सूर्याचा देश
४३) पाठविलेला
४५) फक्त, केवळ
४६) शुभ, पवित्र
४८) वाकबगार
४९) स्तुती करणारा
५०) बारावी रास
५१) फळाचे साल
५३) अडकित्याने कातरले जाणारे फळ
५५) पाठीला आलेली वक्रता
५७) एक द्विदल धान्य
५८) कैवारी, रक्षणकर्ता
५९) भीती, जरब
६१) निकट
६४) कणीदार
६६) मीठ
६७) पातक
६८) छंद, मंजुळ आवाज
६९) पत्र
७१) सूर्य रवि
७२) लाकूड कापण्याचे साधन
७४) व्यापारातील फायदा
७५) कानोसा घेण्यासाठी कान ताठ करणे
७६) गोमाता

**उभे शब्द :-**
१) वाळा
२) अरण्य
३) गाणे
४) वर्ष, सन
५) मूर्ख
६) पिता
७) युद्धातील एक प्रेरणादायी घोषणा
८) राण्यांची राहण्याची जागा
९) खूप खाली
१०) रक्षण करणारे सशस्त्र सैनिक
१२) कचेरी
१५) निष्कारण उठाठेव करणारा, फाजील
१६) कलावंत
२०) करवत
२३) अजगर
२४) (स्फोटाचा) मोठा आवाज
२५) रो ह यो चे पूर्ण नाव
२६) कलेवर
२७) पंख
२८) टीमचा प्रमुख खेळाडू, कॅप्टन
३०) घड्याळाचा जागविणारा आवाज
३१) प्रामाणिक
३२) पूर्ण बदल
३४) दुर्गंधयुक्त
३६) मेघ, जलद
३८) राजपुत्र सलीमची प्रेयसी
३९) समाजाला प्रगतीवर नेणारा
४२) दुनिया
४४) वैताग, वायू
४७) लोकरीचा उबदार पट्टा
४९) किमती बहुमोल, अधिक जड
५२) गव्हाचे कणीदार पीठ
५४) गूळ, साखरेचा रस
५५) वसु, पितरांच्या नावाने सोडलेला खोंड
५६) अलमारी
५८) सुकविणे
६०) जपजाप्य
६२) चेहरा, मुख
६३) उंच सखल नसलेले
६५) दिवस
६७) एक चतुर्थांश
७०) सूक्ष्म अंश, अत्यल्प
७३) काढलेली सुट्टी

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# सिन्नरच्या वाजे विद्यालयात गणेश मूर्ती बनवण्याची कार्यशाळा

**नाशिक ।** लोकनेते शंकरराव बाळाजी वाजे विद्यालयात शाडू मातीपासून गणेश मूर्ती बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली. लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटी व नगर परिषदेच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या कार्यशाळेत ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यामुळे ही कार्यशाळा यंदाची सर्वात मोठी कार्यशाळा ठरली आहे.

नगर परिषदेचे मुख्याधिकारी अभिजित कदम यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटीचे अध्यक्ष सचिव जयवंत काळे, मुख्याध्यापक रायते, लायन्सचे मनीष गुजराती, सोपान परदेशी, अपर्णा क्षत्रिय, उपाध्यक्षा संगीता वाजे नगर परिषदे अधिकारी, कर्मचारी, वाजे विद्यालयाची चित्रकला शिक्षिका, शिक्षक आदी उपस्थित होते. कलाशिक्षक राहुल पगारे, परेश जुमानके यांनी गणेश मूर्ती बनवण्याचे प्रशिक्षण दिले. रमेश जगताप व सुनंदा जगताप कार्यशाळेसाठी आर्थिक योगदान दिले. मुख्याधिकारी कदम यांनी



शाडू माती ही नैसर्गिक रित्या सहज विरघळते. त्यामुळे त्यापासून बनवलेल्या मुर्तीमुळे नदी, तलाव प्रदूषित होत नाहीत. त्यामुळे सर्वांनी शाडू मातीचेच गणपती स्थापीत करावेत, असे आवाहन मुख्याधिकाऱ्यांनी केले. लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटीचे अध्यक्ष बबन वाजे यांनी गणेशोत्सव पयर्वरण पूरक करण्याचे आवाहन केले. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती विरघळत नाहीत. त्यामुळे जीवसृष्टी व पर्यावरणाचे नुकसान होते. त्यातील रसायनांमुळे नदी, तलाव व मूर्ती विसर्जीत होणार पाणी साठे प्रदुषित होतात. त्यापासून जलाशयातील सजिवांना धोका पोहोचतो. हे पर्यावरणाच्या दृष्टीने घातक असून शाडूच्या मातीपासून बनववलेले गणपती स्थापीत करुन पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करावा, असे वाजे यांनी सांगितले. कलाशिक्षक डावरे यांनी प्रास्ताविक केले. मुख्याध्यापक रायते यांनी शाळेभोवतालचे अतिक्रमण काढल्याबद्दल मुख्याधिकारी कदम यांच्या कामाचे कौतुक केले. त्याबद्दल शाळेने त्यांना अभिनंदन पत्र दिले.

# जिवाशिवाची बैलजोडी होतेय कालबाह्य

लक्ष्मण सोनवणे

इंधनावर चालणाऱ्या निरनिराळ्या वाहनांमुळे ग्रामीण भागातील 'बैलगाडी'चे वाहन कालबाह्य होताना दिसत आहे. काही वेळा ऊस वाहतुकीसाठी बैलगाडीचे दर्शन होत असले, तरी त्यांची चाके टायरची आहेत. बैलगाडीवर अवलंबून असणारे व्यावसायिक मात्र यामुळे आर्थिक संकटात आले आहेत. पूर्वी ज्या घरी बैलगाडी होती त्याला 'धनवान' मानले जायचे. बैलांचा वापर हा शेतीकामासाठी केला जात होता. आज मात्र तीच बैलगाडी प्रगतीच्या टप्प्यात न परवडणारे आणि कटकटीचे वाहन बनले आहे. बैलाच्या कुवतीनुसार दीड ते दोन टन वजनाचा माल एका ठिकाणाहून दुसरीकडे नेण्याची क्षमता असलेल्या या वाहनाचा वापर जास्त आठवडेबाजारात केला जात होता. मात्र, त्याची जागा आता मालवाहतूक रिक्षासारख्या वाहनांनी घेतली आहे. आताच्या काळात बैलगाडीची जागा टेम्पो, ट्रक व ट्रॅक्टरने



घेतल्याने हे वाहन दृष्टीस पडणे कठीण बनले आहे. इगतपुरी तालुक्यात बैलगाडीचा वापर पूर्वीपासून होत आहे. बैलांच्या गळ्यातील घुंगरांचा आवाज पहाटेच्या वातावरणात एक वेगळा भाव निर्माण करायचा. त्यामुळे बैलांच्या पायाला नाल ठोकणारे, बांबूच्या बिल्यांपासून बैलगाडीचे आच्छादन बनविणारे कारागीर, अशा व्यावसायिकांचा संसार चालायचा. आता मात्र

> बैलांवर आधारित शेती हरवत चाललेली आहे. नांगरणीची गोडी बैलांच्या टापा आणि मातीचा सुगंध कधीकाळी आपल्या शेतीच्या मुळात असलेले हे चित्र आता हळूहळू काळाच्या पडद्याआड जात आहे. बैलपोळा मातीचे बैल पुजन करण्या इतपत राहिला असून बैलावर आधारित नैसर्गिक शेती करणे गरजेचे आहे.
> **- बाळासाहेब जाधव, डांगीमित्र**

बैलगाडी कालबाह्य होत असल्याने हा व्यवसायही बंद झाला. बैलगाडी कालबाह्य होण्यास विविध कारणे असली, तरी त्यामागील मुख्य कारण म्हणजे इंधनावर चालणाऱ्या गाड्यांची वाढलेली संख्या, हेही आहे. तरी पर्यावरणरक्षण करणाऱ्या बैलगाड्यांकडे केवळ कामी वेगामुळे दुर्लक्ष होत आहे. बैलांच्या गळ्यातील घुंगरांचा मंजूळ आवाज, चाकांची करकर, चाबकाची सळसळ या साऱ्या आठवणी हळूहळू कालबाह्य होऊ लागल्या आहेत.

# काकडपाना येथे रानभाजी महोत्सव



**त्र्यंबकेश्वर ।** तालुक्यातील ग्रामपंचायत चिंचओहळ अंतर्गत येणाऱ्या पेसा ग्रामसभा काकडपाना येथे नुकताच रानभाजी महोत्सव कार्यक्रम पार पडला. सध्याच्या धकाधकी धावपळीच्या जीवनात रानभाज्या हळूहळू नामशेष होत चालल्यात, तरी देखील त्र्यंबकेश्वर तालुक्यातील काही पेसा ग्रामसभांनी रानभाजी महोत्सव कार्यक्रमात रानभाज्या स्वरूपात रानमेवा चाखण्याची परंपरा आजही कायम ठेवली आहे.

रानभाजी महोत्सवात रानभाज्या बघून मनाला आनंद मिळतोच तर वेगवेगळ्या तऱ्हेने बनविलेल्या पाककृती रानभाज्या चाखायला ही मिळतात. यातून दरवर्षी वनस्पतींच्या आयुर्वेदिक



भाजीतून शरीराला आवश्यक असे जीवनसत्व मिळतात. आता नोकरी, व्यावसायिकांना जंगलात फिरायला वेळ अपुरा पडल्याने दैनंदिन आहारामध्ये आयुर्वेदिक रानभाज्यांचा समावेश करण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. परंतु काकडपाना पेसा ग्रामसभेच्या वतीने रानभाज्या महोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. रानभाजी महोत्सव कार्यक्रमात महिलांनी रानभाज्यांचे प्रदर्शन केले. या प्रदर्शनात ठेवण्यात आलेल्या बांबूची वास्ती,पेंढर,मोखा,करवंद,बेलीचे लोणचे,अंबाडी,माटाची भाजी,सरबल, तेरेचे पानवडी, खुरासणी पाला,पांढरी अंबाडी,लाल अंबाडी, शेवग्याचा पाला, कडूकंदाच्या वळी, तोंडवळ, खेकडा, तेटू, करटोल, कुरडू, वाघोट इत्यादी पंन्नास पेक्षा जास्त रानमेवा भाज्यांची पाककृती करून महिलांनी रानभाज्या आणल्या होत्या.लहान थोर ग्रामस्थांसह प्रमुख पाहुण्यांनी विविध रानभाज्यांची चव चाखली. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी गावातील मुली, महिला, पुरुष, तरुण मित्र मंडळी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पुरस्कार म्हणजे चांगले काम केल्याची पावती : गायत्री जाधव

**दिंडोरी ।** आपल्या कामाबद्दल गौरव होणे ही अभिमानास्पद बाब आहे. पुरस्काराने व्यक्तीचा उत्साह वाढतो व चांगले काम



करण्याची नवसंजीवनी व इतरांना प्रेरणा मिळत असते,पुरस्कार मिळणे म्हणजे चांगले काम केल्याची एक प्रकारची पावती असते असे प्रतिपादन वणी पोलिस स्टेशनच्या सहायक पोलिस निरिक्षक श्रीमती गायत्री जाधव यांनी केले. दिंडोरी तालूक्यातील परमोरी येथे ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने "परमोरी ग्रामगौरव सन्मान" पुरस्कार वितरण प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना त्या बोलत होत्या. जाधव यांनी पुढे बोलतांना सांगितले की,प्रत्येकाने आपल्या मुलांशी सुसंवाद साधावा,त्याच्याशी व्यक्त व्हावे जेणेकरून ते देखील व्यक्त होतील व भविष्यात मुलांचे चुकीचे पाऊल पडणार नाही. या वेळी प्रमुख पाहूणे दिडोरी पंचायत समिति गटविकास अधिकारी भास्कर रेंगडे यांनी सांगितले की गावाचा सन्मान हाच सर्वोच्च सन्मान असून, पुरस्कार वितरण सोहळा अतिशय स्तुत्य असल्याचे नमूद केले.

प्रास्ताविक मांडताना ग्रामपंचायत अधिकारी, पंकज पवार यांनी सैनिकांनी देश सेवेसाठी केलेले कार्य त्यांचा गौरव तसेच आयुष्यभर पोलीस खात्यात सेवा केलेल्या सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी, पोलीस पाटील व १९६५ पासून आजतागायत झालेल्या सर्व सरपंच यांचा "ग्राम गौरव" सन्मान या पुरस्काराने सन्मान व्हावा. ग्रामस्थांना प्रेरणा मिळावी यासाठी या पुरस्काराचे आयोजन केले असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन नौशाद अब्बास यांनी केले. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष हभप रमाकांत महाराज, माजी सरपंच जयराम दिघे, उपसरपंच कमल गांगोडे,सर्व ग्रामपंचायत सदस्य, नवनाथ काळोगे,दिलीप केदार, प्रतिभा शिवले, पूजा काळोगे,रुपाली दिघे उपस्थित होते.

# स्वराज्य संवर्धन बहुउद्देशीय संस्थेचा वर्धापन दिन उत्साहात

**दिंडोरी ।** गेल्या काही वर्षांपासून कार्यरत असणारी स्वराज्य संवर्धन बहुउद्देशीय संस्थेने आपली एक वेगळीच ओळख निर्माण केली असून या संस्थेचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन दिंडोरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रघुनाथ शेगर यांनी केले. दिंडोरी तालुक्यातील कोराटे येथील इलेक्ट्रॉनिक सबस्टेशन जवळील प्रांगणात स्वराज्य संवर्धन बहुउद्देशीय संस्थेचा सातवा वर्धापन दिन आयोजित करण्यात आला होता. त्या प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून पोलीस निरीक्षक रघुनाथ शेजर बोलत होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वनविभागाचे वनअधिकारी अशोक काळे, बापू चव्हाण, भगवान गायकवाड, संदीप गुंजाळ, अमोल जाधव, नेहा कदम, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांचा स्वराज्य संवर्धन बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने वृक्षरोप देऊन सत्कार करण्यात आला. कुमारी क्रांती चव्हाणके इच्या वाढदिवसानिमित्त सात वर्षांपूर्वी वृक्षारोपणाला सुरुवात करण्यात आली होती, त्यामुळे वृक्षांचा आणि क्रांती चा वाढदिवस साजरा करून तिला रघुनाथ शेगर यांनी स्कूल बॅग व कवितासंग्रह भेट दिला वनविभागाचे अधिकारी अशोक काळे यांनी प्रतिमा भेट जलसंपादन विभागाचे धनंजय विरकर यांनीही पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व शुभेच्छा दिल्या. कु. क्रांती इने कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकले. यावेळी वनअधिकारी अशोक काळे यांनी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब चव्हाणके यांचे तोंड भरून कौतुक करून सध्या तालुक्यात घडणाऱ्या घटना व बिबट्यापासून संरक्षण कसे करावे याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी पत्रकार भगवान गायकवाड बापू चव्हाण संदीप गुंजाळ अमोल जाधव यांनीही संस्थेचे आपल्या मनोगतातून कौतुक केले. कोराटे येथील नेहा गोटीराम कदम यांनी रशिया



देशात वैद्यकीय क्षेत्रात एमबीबीएस पदवी प्राप्त केल्याने त्यांचाही संस्थेच्यावतीने मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ. नेहा कदम यांनीही संस्थेचे आभार मानून मनोगत व्यक्त केले. यावेळी पोलीस निरीक्षक रघुनाथ शेगर व वनविभागाचे अधिकारी अशोक काळे डॉ. नेहा कदम व पत्रकार बांधव जलसंपदन विभाग पदाधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण सोमवंशी यांनी केले. तर आभार भाऊसाहेब चव्हाणके यांनी मानले.

याप्रसंगी अग्निपंखा करिअर अकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष सागर वानखेडे जलसंपदा विभागाचे धनंजय वीरकर, मयूर माळेकर, वनरक्षक योगेश दळवी, बापू शिरसाट, पाणी वाटप संस्थेचे लक्ष्मण कदम ग्रा.पं. सदस्य दिगंबर शिंदे, गोटीराम कदम, सचिन कदम, सोमनाथ कदम, भास्कर चव्हाणके अमोल शिरसाठ, समाधान जाधव, सजन फलाने, गोटीराम कदम, ऋतिक कदम ऋषिकेश कदम, ऋषिकेश मालसाने, वाळू कदम, आयुश कदम, विक्रम आहेर सरला भालेकर, वनिता कराड, वैष्णवी चव्हाणके, सुयशा चव्हाणके, शितल भालेकर, अंजली जाधव, रुद्राक्ष चव्हाणके, प्रथमेश भालेकर, तेजस कदम, यश कदम आर्दीसह ग्रामस्थ संख्येने उपस्थित होते.

## ➤ महत्त्वाचे

### शालेय कॅरम स्पर्धेत प्राची मनवर विजयी; तनुजा गाढवे उपविजयी

**नाशिक ।** क्रीडा व युवक सेवा संचालनलय, महाराष्ट्र राज्य यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नाशिक यांच्या वतीने आणि नाशिक जिल्हा कॅरम असोसिएशन यांच्या सहकार्याने नाशिकच्या पंचवटी येथील विभागीय



क्रीडा संकुल येथे नाशिक महानगर परिसरातील शाळांच्या आंतर शालेय कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १९ऑगस्ट पासून सुरू झालेल्या या स्पर्धेत आज १७ वर्षे मुलींच्या स्पर्धा खेळविल्या गेल्या. या गटात १०२ खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे उद्घाटन क्रीडा अधिकारी सर्वेश देशमुख आणि क्रीडा प्रशिक्षक तथा कॅरम स्पर्धेच्या प्रमुख प्रीती करावा यांच्या हस्ते कॅरम फोडून करण्यात आले. यावेळी क्रीडा संघटक आनंद खरे, यशवंत ठोके, भरत खत्री, भुषण भटाटे, अभिषेक मोहिते, नकुल चावरे आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी भुषण भटाटे, अभिषेख मोहिते, भरत खत्री, नकुल चावरे आदी परिश्रम घेत आहेत.

# मनमाड शहरात अज्ञाताने जाळल्या तीन दुचाकी



**मनमाड ।** शहरातील मध्यवर्ती ठिकाण आणि रेल्वे स्थानकापासून जवळच असलेल्या जमदाडे चौक परिसरात गुरुवारी पहाटेच्या सुमारास अज्ञातांनी तीन दुचाकीला आग लावून पेटवून दिल्याची घटना घडली. या घटनेमध्ये दोन दुचाकी भस्मसात झाल्या असून एक दुचाकी अर्धवट जळाली आहे. याप्रकरणी मनमाड पोलीस स्थानकात अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रेल्वे स्थानकापासून जवळ असलेल्या जमदाडे चौक परिसरातील रहिवाशी राजेंद्र बहोत यांच्या घरासमोर लावण्यात आलेल्या तीन मोटरसायकली गुरुवारी पहाटेच्या सुमारास अज्ञातांनी पेटून दिल्या. रात्री दोन अडीचच्या सुमारास बहोत त्यांना जाग आली असता घराच्या बाहेर धूर निघत असल्याचे त्यांना दिसून आले. तत्काळ त्यांनी आजूबाजूच्या लोकांना सदरील माहिती कळवली. लोकांनी देखील आग विझवण्याचे प्रयत्न केले. मात्र तोपर्यंत दुचाकींनी पेट घेतला होता. यामध्ये गाडी क्रं एमएच ४१ बीएस १०४९ आणि गाडी क्रं एमएच १५ एचटी २७३० या दुचाकी आगीत भस्मसात झाल्या असून गाडी क्रं एमएच १७ एएस ७७८१ दुचाकी अर्धवट अवस्थेत झाली आहे. आग कोणी आणि का लावली याची काहीच माहिती मिळू शकली नाही. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून वाहन चालक धास्तावले आहेत. याप्रकरणी राजेंद्र बहोत यांनी शहर पोलीस स्थानकास तक्रार दिली आहे. पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामाही केला. पोलीस निरीक्षक विजय करे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# अवधूत कॉलनी नाम फलकाचा अनावरण समारंभ संपन्न

**नाशिक ।** पंचवटी मधील मेरी–रासबिहारी लिंक रोडवरील अवधूत कॉलनीच्या नावाचा नामफलक अनावरण समारंभ नाशिक महानगरपालिकेच्या पंचवटी पूर्व विभागाच्या माजी सभापती सौ. प्रियांका माने आणि धनंजय (पप्पू माने) यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. माने उभयतांच्या हस्ते फलकाचे अनावरण करण्यात आले. श्रीफळ वाढविण्यात आले. प्रभाग ३ मधील सर्व नगरांच्या विकासासाठी आम्ही कटीबद्ध आहोत असेही माने सांगितले. स्वागत प्रास्ताविक वकील राजेंद्र डोखळे यांनी



केले. परिचय आणि सूत्रसंचालन प्रा. दिलीप अहिरे यांनी केले. यावेळी नामफलकाची देणगी देणाऱ्या सुधीरभाऊ भामरे यांचा कॉलनीच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी गणपत शिंदे, प्रवीण नागरे, जिभाऊ सोनवणे, डॉ.सुजित बिस्वास, भिमाजी शेळके, मिथुन पवार, रोहित गोसावी, एम.के.शिवहारे, श्यामराव सस्कर, गिरीश ढोक, रघुनाथ पोटकुळे, सोमनाथ बच्छाव, संदीप सोनवणे, भूषण पाटील, प्रदीप घोसे, स्वप्नील गोसावी, माधव चव्हाण, हिरामण शेळके तसेच परिसरातील सर्व रहिवाशी नागरिक आणि महिला उपस्थित होत्या. जेष्ठ नागरिक आणि महिला यांच्या हस्ते श्रीफळ वाढविण्यात आले.प्रा.संदीप सोनवणे यांनी आभार मानले.

# सिन्नरच्या सार्वजनिक वाचनालयाची निवडणूक बिनविरोध व्हावी : कोतवाल

**सिन्नर ।** सिन्नरचं सांस्कृतिक वैभव असलेल्या सिन्नर सार्वजनिक वाचनालय हे शहराच्या शिरपेचातील मानाचं पान आहे. या संस्थेचा निवडणुक कार्यक्रम नुकताच जाहीर झाला. नव्या जुन्या सभासदांचा योग्य समन्वय व संतुलन ठेऊन निवडणूक निवडणुक प्रक्रिया बिनविरोध व्हावी, अशी प्रामाणिक भावना वाचनालयाचा सभासद म्हणून आपणास व समंजस सिन्नरकरांना वाटते, असे मत सिन्नर सार्वजनिक वाचनालयाचे सभासद नामदेव कोतवाल यांनी व्यक्त केले.

प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्राच्या वाचन आणि ग्रंथ संस्कृतीला आज मरणकळा आलेली आहे. अशा अवस्थेत वयाची पंच्याहत्तरी पुर्ण केलेल्या व शताब्दीकडे



वाटचाल करणारे सिन्नरचे सार्वजनिक वाचनालय हे बिगर राजकीय क्षेत्र म्हणून ओळखले जाते. पण अलिकडच्या काळात या संस्थेत राजकारणाचा शिरकाव झाला आणि आरोप प्रत्यारोपांच्या असुयतेतुन व तुटपुंज्या शासकीय मानधनेतुन चालु असलेल्या संस्थेवर निवडणुकीचा खर्च लादला जाऊ लागला. आपण स्वतः या संस्थेतील गेल्या निवडणुकीतील एक पराभुत उमेदवार आहे. पण कधीही संस्थेच्या वार्षिक सभेत संचालक मंडळावर द्वेषभावनेतुन व नकारात्मक भुमिकेतुन टिप्पणी केली नाही. अर्थात द्वेषाला द्वेषाने उत्तर देणे, हा आपला पिंड कधीच नव्हता. शेवटी सिन्नरचे वाचनालय ही काही आर्थिक देवघेव करणारी संस्था नाही. राजकारण करण्याची तर अजिबात जागा नाही. त्यादृष्टीने शहरातील अनुभवी व ज्येष्ठ धुरीणांचे लवाद नेमुन इच्छुकांनी फार काही ताणाताणी न करता या संस्थेची बिनविरोध प्रक्रिया पूर्ण करावी. आपण जर स्वत:ला सुसंस्कृत व पुढारलेला समाज म्हणून जर मिरवत असेल तर शहराच्या वैचारिक परंपरेच्या अमृतकुंभाला द्वेषाचा आखाडा बनवु नका, एवढीच कळकळीची विनंती असल्याचे श्री. कोतवाल यांनी म्हटले आहे.

## भुजबळांच्या हस्ते 'झेनो हेल्थ'च्या पाचव्या मेडिकल स्टोअरचे उद्घाटन




# परवडणारी आरोग्यसेवा आजच्या काळातील महत्त्वाची गरज : ना. भुजबळ

**नाशिक ।** परवडणारी आरोग्यसेवा हे आजच्या काळातील एक अत्यंत महत्त्वाची गरज आहे. औषधांच्या वाढत्या किमती हे कुटुंबांवर, विशेषतः क्रॉनिक आजारांचे व्यवस्थापन करणाऱ्या कुटुंबांवर, एक मोठा भार आहे. झेनो हेल्थ सारखा उपक्रम नाशिककरांना दिलासा देत आहेत. कारण ते 'सही औषधे सही किंमतीत' उपलब्ध करून देत आहेत. आपल्या शहरात, अशा उपक्रमांचा विस्तार होताना पाहून मला आनंद होत आहे, असे मत महाराष्ट्राचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केले. मुंबई आणि पुण्यातील विश्वसनीय फार्मसी चेन, झेनो हेल्थने नाशिकमध्ये त्यांच्या पाचव्या मेडिकल स्टोरचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले.

यावेळी आमदार सीमाताई हिरे, नाना महाले, बंटी तिदमे, राजेंद्र महाले, रवींद्र पगार आदी उपस्थित होते. झेनो हेल्थने केवळ काही आठवड्यांत चार नवीन मेडिकल स्टोर्स उघडले आहेत. आता त्यांच्या पाचव्या स्टोरचे उद्घाटन झाले. नाशिककरांना परवडणारी आणि उच्च दर्जाची ब्रँडेड व जेनेरिक औषधे उपलब्ध करून देण्याच्या झेनो हेल्थच्या ध्येयातील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. या नवीन लाँचसह, महाराष्ट्रात झेनो हेल्थची २०४ स्टोर्स सुरू झाली आहे. या लाँचबद्दल बोलताना, झेनो हेल्थचे सह-संस्थापक आणि सीईओ सिद्धार्थ गाडिया म्हणाले: "हे उद्घाटन केवळ आणखी एक स्टोर जोडण्याबद्दल नाही, तर ते नाशिकमधील कुटुंबांप्रती असलेल्या आमच्या वचनबद्धतेची पुष्टी करण्याबद्दल आहे. तरुण व्यावसायिकांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत प्रत्येक कुटुंबाला परवडणाऱ्या दरात विश्वासार्ह औषधे घराजवळ उपलब्ध होतील. झेनोमुळे, नाशिकमधील रहिवाशांना आता त्यांची सर्व औषधे एकाच ठिकाणी मिळवता येतील. त्यांना आता एका फार्मसीमधून दुसऱ्या फार्मसीमध्ये जावे लागणार नाही. झेनो फ्री आणि फास्ट डिलिव्हरी देखील देत आहे, जे विशेषतः ज्येष्ठ नागरिकांसाठी खूप उपयुक्त आहे. ग्राहक फक्त एका फोन कॉलद्वारे किंवा झेनो हेल्थच्या ॲपद्वारे त्यांच्या ऑर्डर्स देऊ शकतात. ज्यांना स्टोरला भेट देणे आवडते ते नाशिकमधील झेनो हेल्थच्या कोणत्याही मेडिकल स्टोरमध्ये जाऊन उच्च दर्जाची परवडणारी औषधे घेऊ शकतात.

**नाशिककरांना स्वस्त औषधे उपलब्ध होणार**

आयआयटी बॉम्बेचे माजी विद्यार्थी सिद्धार्थ गाडिया आणि गिरीश अग्रवाल यांनी स्थापन केलेले झेनो हेल्थ हे भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या ओम्नी-चॅनेल फार्मसी नेटवर्कपैकी एक आहे. कंपनीचे ध्येय म्हणजे भौगोलिक स्थान किंवा उत्पन्न काहीही असो, प्रत्येक भारतीयाला उच्च दर्जाची आरोग्यसेवा, सुलभ आणि परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देणे. दोनशेहून अधिक भौतिक स्टोर्स, एक ॲप आणि वेबसाइट यांच्या विश्वासार्ह उपस्थितीसह, झेनो परवडणाऱ्या किमतीत उच्च दर्जाची ब्रँडेड आणि जेनेरिक औषधे उपलब्ध करून देत आहे. झेनोने आधीच तीस लाखांहून अधिक ग्राहकांना सेवा दिली असून, ब्रँडेड व जेनेरिक औषधांवर एक हजार कोटींहून अधिक बचत करून दिली आहे. झेनो फक्त परवडणाऱ्या किमतींवरच नाही, तर जागरूकता निर्माण करण्यावर, विश्वास मजबूत करण्यावर आणि मेट्रो शहरांपासून दुर्गम शहरे आणि खेड्यांपर्यंत औषधांची सोपी उपलब्धता करून देणे यावरही लक्ष केंद्रित करते.



# सेंसेक्स मध्ये 694 अंकांची घसरण

## निफ्टी 25,000 च्या पातळीखाली घसरला

**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**

शुक्रवारी म्हणजे आठवड्याच्या शेवटच्या ट्रेडिंग सेशनमध्ये शेअर मार्केटने सलग सहा दिवस चालू असलेली वाढ थांबवली. दोन्ही बेंचमार्क इंडेक्स लाल निशाणावर बंद झाले. एका बाजूला सेंसेक्समध्ये ६९४ अंकांची घसरण आणि निफ्टीमध्ये २१४ अंकांची घसरण झाली.

शुक्रवार सकाळी सेंसेक्सने ८१,९५१ च्या पातळीवर ओपनिंग दिली आणि दिवसाखेर ०.८५ टक्के घसरून ८१,३०६ च्या पातळीवर बंद झाला. निफ्टी ५० ने शुक्रवार सकाळी २५,०६४ च्या पातळीवर ओपनिंग दिली आणि दिवसाखेर ०.८५ टक्के घसरून २४,८७० च्या पातळीवर बंद झाला.

बेंचमार्क इंडेक्सप्रमाणे स्मॉलकॅप आणि मिडकॅप इंडेक्समध्येही घसरण झाली. बीएसई मिडकॅप इंडेक्स ०.२३ टक्क्यांनी घसरला आणि स्मॉलकॅप इंडेक्स ०.३५ टक्क्यांनी घसरला.

बीएसईवर लिस्टेड कंपन्यांचे मार्केट कॅप मागील सेशनच्या ४५६.३ लाख कोटी रुपयांवरून घटून ४५४ लाख कोटी रुपये झाले. त्यामुळे गुंतवणूकदारांना एका सेशनमध्येच २ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त तोटा सहन करावा लागला.

निफ्टी ५० च्या टॉप गेनर्समध्ये सर्वात जास्त फायदा महिंद्रा अँड

**सेन्सेक्स 81,306**

**निफ्टी 24,870**

महिंद्राला झाला, ज्यात ०.८३ टक्के वाढ झाली. त्यानंतर, मारुती सुझुकीत ०.४९ टक्के वाढ, भारती एअरटेलमध्ये ०.१८ टक्के वाढ, भारत इलेक्ट्रॉनिक्समध्ये ०.१८ टक्के वाढ, टायटन कंपनीत ०.१३ टक्के वाढ झाली.

निफ्टी ५० मध्ये सर्वाधिक नुकसान एशियन पेंट्सला झाले, ज्यात २.४२ टक्क्यांची घसरण झाली. त्यानंतर ग्रासिम इंडस्ट्रीजमध्ये २.३४ टक्के घसरण, अदानी एंटरप्रायझेसमध्ये २.२१ टक्के घसरण, अल्ट्राटेक सिमेंट्समध्ये २.१९ टक्के घसरण, हिरो मोटोकॉर्पमध्ये १.९५ टक्के घसरण झाली.

घसरणीच्या या मार्केटमध्येही निफ्टी मीडियामध्ये वाढ झाली, तो ०.९५ टक्क्यांनी उचलला गेला. त्यानंतर निफ्टी फार्मामध्ये ०.३९ टक्के वाढ, निफ्टी इंडिया डिफेन्समध्ये ०.२९ टक्के वाढ झाली.

सर्वात जास्त घसरण निफ्टी मेटलमध्ये झाली आणि तो १.२५ टक्क्यांनी खाली आला. त्यानंतर पीएसयू बँकमध्ये १.१२ टक्क्यांची घसरण, निफ्टी बँकमध्ये १.०९ टक्क्यांची घसरण, निफ्टी प्रायव्हेट बँकमध्ये १.०६ टक्क्यांची घसरण, निफ्टी एफएमसीजीमध्ये १ टक्क्यांची घसरण आणि निफ्टी रिअल्टीमध्ये ०.८४ टक्क्यांची घसरण झाली.

# भटक्या कुत्र्यांना रस्त्यावर खायला घालायला परवानगी नाही

## सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निर्देश; सर्व राज्यांना निर्णय लागू!

**नवी दिल्ली, दि. २२ वृत्तसंस्था**

दिल्लीतील भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नी सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी आधीच्या ११ ऑगस्टच्या आदेशात बदल केला. कुत्र्यांना नसबंदी आणि लसीकरणानंतर त्याच भागात परत सोडले जाईल. दरम्यान, भटक्या कुत्र्यांना रस्त्यावर खायला घालायला परवानगी दिली जाणार नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून देशभरात भटक्या कुत्र्यांचा मुद्दा चर्चेत आला आहे. एकीकडे प्राणीप्रेमी किंवा भटक्या कुत्र्यांना खाऊ घालणाऱ्यांसाठी हा मुद्दा भावनिक झालेला असताना या कुत्र्यांमुळे प्रचंड मनस्ताप आणि प्रसंगी शारिरीक इजा सहन कराव्या लागणाऱ्यांसाठी हा मुद्दा महत्त्वाचा ठरला आहे. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयातील या प्रकरणाच्या सुनावणीकडे सगळ्यांचं लक्ष लागलं होतं. अखेर सर्वोच्च न्यायालयाने आपल्याच दोन सदस्यीय खंडपीठाने ११ ऑगस्ट रोजी दिलेला निर्णय बदलून नवे निर्देश दिले आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे हे न्यायालयाने आज दिलेले आदेश जरी राजधानी दिल्लीशी निगडित प्रकरणी दिले असले, तरी ते देशातील सर्व राज्यांना लागू असतील, असं न्यायालयाने नमूद केलं आहे.



सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या नव्या आदेशांनुसार, राजधानी दिल्लीतून ताब्यात घेतलेल्या सर्व भटक्या कुत्र्यांना लसीकरण व निर्बिजीकरण केल्यानंतर सोडण्यात येणार आहे. न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता व न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यामध्ये फक्त ज्या कुत्र्यांना रेबिजची लागण झाली आहे किंवा जे कुत्रे आक्रमक वर्तन करताना दिसत आहेत, अशा कुत्र्यांनाच फक्त त्यांच्यासाठीच्या निवारा केंद्रांमध्ये ठेवण्यात येणार आहे. यासंदर्भात १० दिवसांपूर्वी म्हणजेच ११ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या दोन सदस्यीय खंडपीठाने दिलेल्या निर्णयात न्यायालयाने महत्त्वपूर्ण बदल केले आहेत.

११ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या दोन सदस्यी खंडपीठाने दिल्ली एनसीआरमधील सर्व भटक्या कुत्र्यांना ताब्यात घेऊन निवारा केंद्रांमध्ये बंद करण्याचे आदेश दिले होते. या सर्व कुत्र्यांना बाहेर न सोडण्याबाबत न्यायालयाने आदेशांमध्ये उल्लेख केला होता. न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला व न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने हे निर्देश दिले होते. वरीष्ठ वकील गौरव अगरवाल यांच्या शिफारसीनुसार न्यायमूर्तींनी यासंदर्भातले आदेश दिले होते. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने आधीच्या खंडपीठाने दिलेल्या आदेशांमध्ये बदल केले असले, तरी काही मुद्दे मात्र कायम ठेवले आहेत. त्यानुसार, देशभरात कोणतीही व्यक्ती वा संस्था स्थानिक प्रशासनाला भटक्या कुत्र्यांना ताब्यात घेण्यापासून रोखू शकत नाही.

तसेच, प्रशासनाने भटक्या कुत्र्यांना खाऊ घालण्यासाठी ठिकठिकाणी स्वतंत्र अशा जागेची व्यवस्था करावी, हे निर्देशही नव्या खंडपीठाने आपल्या निकालात कायम ठेवले आहेत.

# कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांनी विधानसभेत गायले संघाचे गीत; सभागृहात खळबळ

**बंगळूरू, दि. २२ वृत्तसंस्था**

कर्नाटकचे उपमुख्यमंत्री आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार यांनी गुरुवारी विधानसभेत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. चिन्नास्वामी स्टेडियमजवळ झालेल्या चेंगराचेंगरीच्या विषयावर चर्चा सुरू असताना, शिवकुमार यांनी थेट राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे 'नमस्ते सदा वत्सले मातृभूमे' हे गीत गाऊन सभागृहात एकच खळबळ उडवून दिली.

विधानसभेत चिन्नास्वामी स्टेडियममधील चेंगराचेंगरीच्या घटनेवर चर्चा सुरू होती. यावेळी भाजप आमदारांनी शिवकुमार यांच्यावर गंभीर आरोप केले. "चिन्नास्वामी स्टेडियममधील चेंगराचेंगरीला शिवकुमार यांनीच खतपाणी घातले. आरसीबी संघाच्या आगमनावेळी विमानतळापासून ते स्टेडियमपर्यंत कन्नड ध्वज फडकावून त्यांनी मोठ्या प्रमाणावर उन्माद पसरवला," असा दावा भाजपने केला.

भाजपच्या आरोपांना उत्तर देताना शिवकुमार म्हणाले, 'मी कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनचा सदस्य आहे आणि तेथील सचिव व इतर सर्वजण माझे मित्र आहेत. मी बंगळूरचा पालकमंत्री आहे. त्यामुळे मी विमानतळ आणि स्टेडियमवर गेलो होतो. मी कर्नाटकचा ध्वज हातात घेतला, आरसीबी संघाला शुभेच्छा दिल्या आणि कपचे चुंबनही घेतले. मी माझे काम केले.' विरोधी पक्षावर निशाणा साधताना ते पुढे म्हणाले, 'चेंगराचेंगरीची घटना दुर्दैवी आहे, पण अशा घटना इतर राज्यांतही घडल्या आहेत. गरज पडल्यास इतर राज्यांत घडलेल्या अशा घटनांची संपूर्ण यादीच मी सभागृहात वाचून दाखवेन. मी सुद्धा तुमच्याबद्दल बरेच काही बोलू शकतो,' असा थेट इशाराही त्यांनी दिला.



याच चर्चेदरम्यान, विरोधी पक्षनेते आर. अशोक यांनी शिवकुमार यांना त्यांच्या 'मी संघाची चड्डी घालतो' या जुन्या वक्तव्याची आठवण करून दिली. यावर शिवकुमार यांनी मिश्किलपणे संघाचे 'नमस्ते सदा वत्सले मातृभूमे' हे प्रार्थनागीत गाऊन दाखवले. विशेष म्हणजे, शिवकुमार जेव्हा हे गीत गात होते, तेव्हा भाजपच्या आमदारांनी बाके वाजवून त्यांना जोरदार दाद दिली, तर दुसरीकडे काँग्रेसच्या गोटात मात्र पूर्ण शांतता पसरली होती. यावर भाजप आमदार व्ही. सुनील कुमार यांनी, 'आशा आहे की या ओळी विधानसभेच्या कामकाजातून वगळल्या जाणार नाहीत,' अशी कोपरखळी मारली. शिवकुमार यांनी आपल्या सरकारची पाठराखण करताना सांगितले की, 'अशा घटनांनंतर इतर सरकारांनी कधी जबाबदारी स्वीकारली आहे का? तुम्हाला अभिमान वाटला पाहिजे की आमच्या सरकारने चेंगराचेंगरीनंतर तातडीने कारवाई करत पोलीस अधिकारी आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळूर यांच्यावर कारवाई सुरू केली.'

# चीनचा भारताला पाठिंबा

## अमेरिकेवर केला 'दादागिरी'चा आरोप

**नवी दिल्ली, दि. २२ वृत्तसंस्था**

अमरिकेने भारतावर ५० टक्के टॅरिफ लादल्यानंतर नवी दिल्ली आणि वॉशिंग्टन यांच्यातील संबंध तणावाचे बनले आहेत. यादरम्यान भारत आणि चीन या दोन देशांमधील संबंधांमध्ये काही सुधारणा होताना पाहायला मिळत आहे. यादरम्यान चीनचे दिल्लीतील राजदूत राजदूत झू फेहोंग यांनी गुरूवारी अमेरिका हा असा 'दादा' आहे, जो वेगवेगळ्या देशांकडून जास्त किमतीची मागणी करण्यासाठी टॅरिफ हे एक वाटाघाटीचे साधन म्हणून वापरत असल्याचे म्हटले आहे. तसेच भारतावर ५० टक्के टॅरिफ लादण्याच्या अमेरिकेच्या निर्णयाचा चीन जोरदारपणे विरोध करतो आणि केंद्रस्थानी जागतिक व्यापर संघटना असलेल्या बहुराष्ट्रीय व्यापार प्रणालीला सुरक्षित ठेवण्यासाठी चीन भारताबरोबर भक्कमपणे उभा राहील, असेही ते म्हणाले आहेत.



नवी दिल्ली येथील थिंक टँक्स चिंतन रिसर्च फाउंडेशन आणि सेंटर फॉर ग्लोबल इंडिया इनसाइट्स यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात चीनचे राजदूत बोलत होते. एका देशाचे वर्चस्व, परदेशी मालावर कर लादून स्वदेशी उद्योगांचे संरक्षण करणे, पॉवर पॉलिटिक्स आणि दादागिरीच्या काळात चीन आणि भारत यांच्यावर पुढाकार घेऊन 'एकसमान आणि ऑर्डरली मल्टिपोलार वर्ल्ड' याचा प्रचार करण्याची जबाबदारी आहे.

# श्रीलंकेचे माजी राष्ट्राध्यक्ष रानिल विक्रमसिंघे यांना अटक

**कोलंबो, दि. २२ वृत्तसंस्था**

सरकारी निधीच्या गैरव्यवहार प्रकरणी श्रीलंकेचे माजी राष्ट्राध्यक्ष रानिल विक्रमसिंघे यांना शुक्रवारी अटक करण्यात आली. या वृत्ताची पुष्टी एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने केली आहे. ७६ वर्षीय विक्रमसिंघे यांना समन्स बजावून चौकशीसाठी बोलावण्यात आले होते. यादरम्यान त्यांना कोलंबो येथील गुन्हे अन्वेषण विभागात ताब्यात घेण्यात आले, असे पोलिसांनी सांगितले. त्यांच्यावर झालेली ही अटकेची कारवाई सप्टेंबर २०२३ मधील लंडनला गेलेल्या भेटीशी संबंधित आहे. तिथे ते त्यांच्या पत्नीच्या विद्यापीठ पदवीदान समारंभासाठी उपस्थित राहिले होते. हा त्यांचा शासकीय दौरा नव्हता. पण त्यासाठी त्यांनी सरकारी पैशाचा वापर केला, असा त्यांच्यावर आरोप आहे.

त्यांच्या अटकेनंतर, त्यांना कोलंबो फोर्ट मॅजिस्ट्रेट यांच्यासमोर हजर केले जाईल. तेथे त्यांच्यावर सरकारी निधीचा वैयक्तिक कारणासाठी वापर केल्याच्या आरोपाखाली खटला चालवला जाणार आहे. दरम्यान, विक्रमसिंघे यांनी त्यांच्या पत्नीच्या लंडन दौऱ्यासाठी सरकारी निधीचा वापर केल्याचा आरोप फेटाळून लावला आहे. त्यांनी म्हटले आहे की त्यांच्या पत्नीचा लंडन दौऱ्याचा खर्च स्वतः केला. त्यासाठी सरकारी निधीचा वापर केला नाही. गोटाबाया राजपक्षे यांच्या राजीनाम्यानंतर जुलै २०२२ मध्ये विक्रमसिंघे राष्ट्राध्यक्षपदी विराजमान झाले होते. श्रीलंकेत झालेल्या हिंसक निदर्शनानंतर गोटाबाया राजपक्षे देश सोडून पळून गेले. त्यानंतर त्यांनी राष्ट्राध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर २० जुलै रोजी संसदेतील राष्ट्राध्यक्ष निवडणुकीत रानिल विक्रमसिंघे विजयी झाले होते. पण सप्टेंबर २०२४ मधील निवडणुकीत ते पराभूत झाले.

# जीवाश्म इंधनांना पर्याय; सॅपचे इंधन

**पेट्रोल,डिझेल,सीएनजी यासारख्या पारंपरिक जीवाश्म इंधनाचा नैसर्गिक साठा हा वर्षानुवर्षाच्या अतिरेकी वापरामुळे आता संपुष्टात येऊ लागलेला दिसतोय. अर्थात या पारंपरिक इंधनाला पर्याय म्हणूनच विजेवर किंवा सौरऊर्जेवर चालणारी वाहनांची आता निर्मिती होताना दिसतेय. तरी सुद्धा अशा इंधनाला आणखी उपलब्ध पर्यायाचा विचार गांभीर्याने करण दृष्टीने प्रत्यक्ष कार्यवाही करण आता काळाची गरज बनली आहे. इंडियन ऑइल कॉर्पोरेशन ने याच अनुषंगाने सॅप हा वापरलेल्या घटकापासून निर्माण केल्या जाणाऱ्या हवाई इंधनाचा पर्याय शोधलेला आहे. हा पर्याय नेमका काय आहे?हे सैफ हवाई इंधन नेमके काय आहे?याच प्रश्नाची उकल करण्यासाठी इंडियन ऑइल कॉर्पोरेशनचे अध्यक्ष अरविंद सहानी यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.**

१] वापरलेल्या घटकापासून इंडियन ऑइल कॉर्पोरेशन सॅप इंधनाची निर्मिती कशी करणार आहे?

आपण स्वयंपाक केल्यानंतर वाया जाणारे तळणीचे तेल,उसाचे चिपाड,मक्याची सालपट,आदी वापरलेल्या घटकापासून [बिगर पेट्रोलियम फीड्सटॉक ]आयओसी शाश्वत इंधनाची निर्मिती करणार आहे. हे इंधन हवाई इंधन प्रकारचे असून याचा पुरवठा इंडियन ऑइल एअर इंडियाला करणार आहे. यासाठी दोन्ही कंपन्यांमध्ये महत्वाचा करार देखील संपन्न झालेला आहे. आयओसी यावर्षीच्या डिसेंबर महिन्यापासून आपल्या पानिपत रिफायनरी मध्ये वापरलेल्या स्वयंपाकाच्या तेलापासून सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल ची निर्मिती सुरु करणार असून यासाठी आयटीसी आणि हल्दीराम यासारख्या हॉटेल रेस्टोरा साखळीतून मिळणाऱ्या वापरलेल्या तेलापासून २५ हजार टन ग्रीन इंधन तयार केले जाणार आहे.



साप्ताहिक संवाद

लोकरंग

२]इंडियन ऑइल कॉर्पोरेशन आणि एअर इंडिया या कंपन्यांमध्ये या हवाई इंधनसंदर्भात कोणता करार झालेला आहे?

इंडियन ऑइल कोर्पोरेशन चे अध्यक्ष अरविंद सहानी आणि एअर इंडियाचे सीईओ कंपेबल विल्सन यांच्या उपस्थितीत हा करार संपन्न झालेला आहे. या करारानुसार विमान वाहतुकीत कमी कार्बन इंधनाचा वापर वाढविणे,जागतिक कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या उद्दिष्टाना पाठिंबा देणे आणि अधिक टिकाऊ हवाई वाहतूक इंधन कार्यान्वयीत करण्यासाठी संक्रमण करण्यास योगदान देण्याबाबत दोन्ही पक्षांची सामाइक बांधिलकी याबद्दल सामंजस्य करण्यात आले. पानिपत रिफायनरी यामध्ये सॅप उत्पादनासाठी आयएससीसी कोर्सिया प्रमाणपत्र मिळवणारी आयओसी हि पहिली भारतीय कंपनी ठरली आहे.

३] सॅप नेमके काय असणार आहे?

सॅप हे बिगर पेट्रोलियम फीड्सटोक पसरून बनवलेले एक पर्यायी हवाई इंधन आहे. हे इंधन हवाई वाहतुकीत कार्बनचे होणारे मोठ्या प्रमाणातील उत्सराज कमी करण्यास महत्वाचे ठरणार आहे. उपलब्धतेनुसार हे पारंपरिक एव्हिएशन टर्बाईन फ्युएल [ईटीएफ किंवा जेट फ्युएल ]मध्ये ५० टक्क्यापर्यंत मिसळता येणार आहे. देशात २०२७ पासून आतंरराष्ट्रीय विमान कंपन्यांना विकल्या जाणाऱ्या जेट फ्युएल यामध्ये १ टक्के सॅप मिश्रण अनिवार्य करण्यात आले आहे.

# मुथूट एक्झिमचे छ. संभाजीनगरमध्ये नवे गोल्ड पॉइंट सेंटर



१३८ वर्ष जुन्या व्यवसाय समूह मुथूट पप्पाचन ग्रुपची (मुथूट ब्लू म्हणूनही ओळखली जाते) मौल्यवान धातूची शाखा म्हणजेच मुथूट एक्झिम प्रायव्हेट लिमिटेडला छत्रपती संभाजीनगर मध्ये आपल्या नवीन गोल्ड पॉइंट सेंटरच्या भव्य उद्घाटनाची घोषणा करताना अभिमान वाटत आहे. नवीन मुथूट गोल्ड पॉइंट सेंटर हे दुकान क्र. 3, कुबेर एव्हेन्यू बी, हॉटेल अतिथी समोर, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र येथे मोक्याच्या ठिकाणी आहे. मुथूट एक्झिमचे हे भारतातील ५८ वे गोल्ड पॉइंट सेंटर आहे आणि फिरत्या गाडीसह महाराष्ट्रातील हे सहावे केंद्र आहे.

नोंद

महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथे या गोल्ड पॉइंट सेंटरचे उद्घाटन केल्याने स्थानिक लोकांच्या आर्थिक जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणेल. यामुळे त्यांना त्यांच्या सोन्याच्या वस्तू विकण्याची सुविधा तर मिळेलच, याशिवाय या विश्वासार्ह व पारदर्शक केंद्राद्वारे वित्तीय सेवा अधिक सुलभ होतील. मुथूट एक्झिमचे गोल्ड पॉइंट सेंटर पारदर्शकता, ग्राहकांचा विश्वास जपणे, बांधिलकी आणि त्यांच्या वचनबद्धतेसाठी प्रसिद्ध आहेत. या केंद्रांवर, ग्राहक त्यांच्या जुन्या आणि वापरलेल्या सोन्याच्या वस्तू वाजवी आणि अचूक मूल्यमापनाच्या आश्वासनासह विकू शकतात. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडली जाते, ज्यामुळे ग्राहकांना प्रत्यक्ष मूल्यांकन पाहता येते. IMPS, NEFT किंवा RTGS सारख्या सुविधांच्या माध्यमातून मोठ्या रकमेचे पेमेंट केले जाते, तर 10,000 रुपयांपर्यंतच्या सोन्यासाठी झटपट रोख पेमेंट केले जाते, ज्यामुळे अखंडित आणि विश्वासार्ह व्यवहाराचा अनुभव मिळतो.मुथूट एक्झिम प्रायव्हेट लिमिटेड (एमईपीएल) मौल्यवान धातूंच्या बाजारपेठेत नाविन्यपूर्णता आणण्याच्या बाबतीत आघाडीवर आहे. भारतात सोन्याचे पुनर्वापर केंद्र सुरू करणारी पहिली संघटित कंपनी म्हणून, एमईपीएलने उद्योग क्षेत्रात सातत्याने एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

# हिरवंगार गुवाहाटी

चला पर्यटनाला



आसामच्या राजधानीचं शहर म्हणजे गुवाहाटी. ब्रम्हपुत्रा नदीच्या किनाऱ्यावर वसलेल्या या शहराकडे पर्यटक आकर्षित होत असतात. घाटातून होणारी बसवाहतूक, रमणीय हिरवागार डोंगराळ परिसर, शेती व बागायती परिसर यामुळे हिवाळ्यात जाण्यासाठी हा एक वेगळा पर्याय तुमच्यासमोर असेल.भारताच्या ईशान्येकडील अति रमणीय, नैसर्गिकदृष्ट्या नटलेला आसाम पर्यटकांसाठी चांगलं आकर्षण आहे. 'आसाम' म्हणजे म्यानमार, तिबेट (चीन) भूतान, पू. बंगाल (बांगलादेश) ह्या आंतरराष्ट्रीय सीमांना भिडलेला भाग आहे. गुवाहाटी हे आसाममधलं महत्त्वाचं शहर होय. बाजूनं जाणारी ब्रह्मपुत्रा नदी, घाटातून चालणारी बसवाहतूक, रमणीय हिरवागार डोंगराळ परिसर, शेती व बागायती परिसर पर्यटकांना आकर्षित करीत असतो. ह्या भागांतून तिस्ता, हुगळी, गंगा, ब्रह्मपुत्रा ह्या नद्या जातात. साहजिकच हा परिसर शेतीनं संपन्न आहे. इंडस्ट्री म्हणावी तशी नसल्यानं शांत, प्रदूषणमुक्त परिसरातून प्रवास होतो. गुवाहाटीजवळ एक मोठा प्रसिद्ध तलावही आहे, जिथे विविध प्रकारचे पक्षी पाहायला मिळतात.'गुवाहाटी' रेल्वेस्थानक प्रशस्त असून आसपास पर्यटकांसाठी भरपूर हॉटेल्स आहेत. तेथून जवळच म्हणजे सुमारे तीन किमीवर लांब व रुंद पात्र असलेली 'ब्रह्मपुत्रा' दिसते. छोट्या बोटीने नदी काठ पार करावा लागतो. बोटीतून ब्रह्मपुत्रा पार करणं म्हणजे पर्यटकांसाठी पर्वणीच असते. ब्रह्मपुत्रा जिथे उगम पावते तेथे बेट असून काही (५० ते ६०) पायऱ्या वर चालल्यावर उमानंद महादेव शिवमंदिर आहे. पुढे नवग्रह, वशिष्ठ मंदिर २० किमीवर असून त्याची बांधणी दगडी आहे. गुवाहाटी रेल्वेस्टेशनहून सुमारे ३० किमीवर सफेद मार्बलचं बालाजी मंदिर आहे. 'कलाक्षेत्र' या सांस्कृतिक संग्रहालयात आसामची सांस्कृतिक झलक पाहायला मिळते.गुवाहाटीपासून ६० किमी 'हाजो' इथे विष्णू महादेव मंदिर असून ते चढावावर आहे. तलावात पाय धुवूनच पुढे ७०-८० पायऱ्या चढून वर जावं लागतं. मंदिर पूर्ण दगडी असून आत कृष्णाच्या पाच वेगवेगळ्या मूर्ती आहेत. ह्याला मंदिराला आसामचं खजुराहो म्हणतात.गुवाहाटीपासून जेमतेम ४० किमीवर 'सौलकुची' नावाचं महिला पर्यटकांना आकर्षित करणारं ठिकाण आहे.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# सरपंचाने प्रेयसीची केली हत्या

## मृतदेहाचे सात तुकडे करून विहिरीत फेकले

**झाशी, दि. २२ वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशातील किशोरपुरा गावातील माजी प्रधानाने एका विधवा प्रेयसीची हत्या केल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

झाशी जिल्ह्यातील किशोरपुरा गावातील एका विहिरीत एका महिलेचा छिन्नविछिन्न अवस्थेत मृतदेह आढळून आला होता. या हत्येच्या प्रकरणात पोलिसांनी दोघांना अटक केलं आहे. या घटनेतील मुख्य आरोपी गावचा माजी प्रमुख असून त्याची ओळख पीडितेचा प्रियकर म्हणून पुढे आली आहे. तो आणि त्याच्या पुतण्याला पोलिसांनी अटक केलं आहे. या प्रकरणातील आणखी एक आरोपी फरार असल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे.

किशोरपुरा गावातील माजी प्रधानावर त्याची प्रेयसी लग्नासाठी सातत्याने दबाव आणत होती. मात्र, त्याचा राग अनावर झाला आणि संतापलेल्या माजी प्रधानाने पुतण्याला बरोबर घेत दोघांनी मिळून तिची हत्या केली. एवढंच नाही तर मृतदेहाचे सात तुकडे करून पोत्यात भरून विहिरीत फेकून दिले. दरम्यान, प्रेयसीच्या सततच्या लग्नाच्या तगाद्यामुळे वैतागून माजी प्रधानाने हे पाऊल उचलल्याचं प्राथमिक तपासात समोर आलं आहे. माजी प्रधान संजय पटेल आणि त्याचा पुतण्या संदीप पटेल असं या घटनेतील आरोपींचं नाव आहे.

१३ ऑगस्ट रोजी एक शेतकरी आपल्या शेताची पाहणी करण्यासाठी गेला होता. तेव्हा त्याला त्याच्या शेतातील विहिरीतून दुर्गंधी येत असल्याचं आढळून आलं. त्यानंतर विहिरीत पाहिलं असता पाण्यात दोन पोते तरंगताना आढळून आले. त्या पोत्यात एका महिलेचा मृतदेह होता. यानंतर संबंधित घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली आणि घटना उघडकीस आली.

# जम्मू काश्मीरमधील सहा पोलिसांसह दोन जणांना सीबीआयकडून अटक

**श्रीनगर, दि. २२ वृत्तसंस्था**

पोलीस कर्मचाऱ्याला ताब्यात घेऊन छळ केल्याच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर जम्मू काश्मीर पोलिसांनी कारवाई केली आहे. पोलिसांनी सहा पोलिसांसह दोन नागरिकांना अटक केली आहे. या आरोपींवर क्रूर आणि अमानवी यातना देऊन पोलीस कॉन्स्टेबलला छळ केल्याचा आरोप आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार अटकेमध्ये पोलीस उपाधीक्षक, पोलीस निरीक्षक आणि सहायक उपनिरीक्षक यांचा समावेश आहे. आरोपी पोलीस कर्मचाऱ्यांना त्यांच्याकडील शस्त्र आणि सरकारी सामान जिल्हा पोलीस कार्यालयात जमा करण्याचे निर्देश दिले आहेत.

पोलीस कॉन्स्टेबलचा छळ केल्याच्या प्रकरणात प्राथमिक गुन्हा दाखल करण्याचे सर्वोच्च न्यायालयानं 21 जुलैला सीबीआयला आदेश दिले होते. तसेच पीडितला 50 लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे केंद्रशासित प्रदेश प्रशासनाला आदेश दिले होते. बेकायदेशीरपणे ताब्यात घेतलेला पोलीस कॉन्स्टेबलच्या शरीरावर अनेक जखमा होत्या. गुप्तांगात मिरची पावडर टाकणं आणि वीजेचा धक्का देऊन अमानवी पद्धतीनं गंभीर जखमा केल्याचा आरोप आहे.

# गगनयान अंतराळात झेपावणार

**नवी दिल्ली, दि. २२ वृत्तसंस्था**

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने देशवासियांना मोठी आनंदवार्ता दिली आहे. मिशन गगनयानबाबत एक मोठी अपडेट त्यांनी दिली. इस्रोचे प्रमुख व्ही. नारायणन यांनी गुरुवारी याविषयीची माहिती दिली. यावर्षी डिसेंबरमध्ये पहिल्या मानवरहित मोहिमेसाठी गगनयान-जी1 प्रक्षेपत केले जाईल. नारायणन यांनी केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह आणि ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला आणि प्रशांत बालकृष्णन नायर यांच्यासह त्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी त्यांनी ही महत्त्वाची बातमी दिली आहे.

नारायणन म्हणाले की, गेल्या चार महिन्यात या क्षेत्रात अनेक नवीन कामगिरी बजावण्यात आली आहे. त्यात अनेक प्रयोग यशस्वी ठरली आहे. त्यातच पहिले मानवविरहीत मिशन जी1 या वर्षाच्या अखेरीस, डिसेंबरच्या जवळपास प्रक्षेपित करण्यात आले. त्यात अर्धमानव सारखी दिसणारी व्योमामित्रा सुद्धा अंतराळात जाणार आहे.

यशस्वी ॲक्सिओम-4 मोहिमेवर शुक्ला होते. ते परत आले आहेत. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाचा (ISS) अनुभव भारताच्या स्वतःच्या गगनयान मोहिमेसाठी आणि भारतीय अंतराळ स्थानकासाठी उपोयगी ठरणार असल्याचे शुक्ला म्हणाला. आम्ही लवकरच आपल्या कॅप्सूलमधून, आपल्या रॉकेटचा वापर करत पृथ्वीवरून कोणाला तरी अंतराळात पाठव. या मोहिमेसाठी मदत करणाऱ्यांचे,सरकारचे, इस्रोचे शुक्ला यांनी आभार मानले. गगनयान मोहीम ही संपूर्ण देशासाठी एखाद्या मोहिमेपेक्षा कमी नाही असे शुक्ला म्हणाले.

गगनयान मोहिम ही इस्रोची महत्त्वकांक्षी अंतराळ मोहिम आहे. भारत या मोहिमेत पहिल्यांदाच अंतराळात मानव पाठवणार आहे. पृथ्वीच्या समतल कक्षेत मानवाला पाठवणे हे या मोहिमेचा उद्देश आहे. सुरक्षित अंतराळ मोहिमा सुरक्षितपणे राबवणे, अंतराळवीरांना पुन्हा पृथ्वीवर आणणे आणि अंतराळात भारताचे सक्षम नेतृत्व समोर आणणे हा या योजनेचा उद्देश आहे.

# वर्ल्डकपच्या वेळापत्रकात केला बदल, भारताचे दोन सामने मुंबईत होणार

**मुंबई, दि. २२ प्रतिनिधी**

आशिया चषक २०२५ नंतर भारतात महिलांचा एकदिवसीय विश्वचषक २०२५ खेळवला जाणार आहे. या स्पर्धेचं वेळापत्रक देखील आयसीसीने पूर्वीच जाहीर केलं आहे. पाकिस्तानचा संघ वर्ल्डकप सामने श्रीलंकेत खेळवले जाणार आहेत. पण आता आयसीसीने या वेळापत्रकात बदल केला आहे. वेळापत्रकातील सामन्यांच्या ठिकाणांमध्ये बदल केला आहे.

एकदिवसीय विश्वचषकासाठी भारताचा महिला संघ देखील जाहीर करण्यात आला आहे. हरमनप्रीत कौरच्या खांद्यावर संघाच्या नेतृत्त्वाची जबाबदारी असेल. तर स्मृती मानधना या संघाची उपकर्णधार असणार आहे. महिलांच्या विश्वचषकाचे सामने गुवाहाटी, इंदौर, विशाखापट्टणम आणि बंगळुरू येथे सामने खेळवले जाणार होते. पण आता आयसीसीने शेअर केलेल्या सुधारित वेळापत्रकात बंगळुरूऐवजी मुंबईत सामने खेळवले जाणार आहेत.

भारताचे दोन आणि श्रीलंका विरूद्ध बांगलादेश यांच्यातील सामना नवी मुंबई येथील डी वाय पाटील स्टेडियममध्ये खेळवला जाणार आहे. महिला विश्वचषक २०२५ चे एकूण ४ सामने बेंगळुरूच्या चिन्नास्वामी क्रिकेट स्टेडियमवर खेळवले जाणार होते. यामध्ये तीन लीग सामने आणि एक उपांत्य फेरीच्या सामन्याचा समावेश होता.

३० सप्टेंबर रोजी होणारा भारत विरुद्ध श्रीलंका सामना, ३ ऑक्टोबर रोजी होणारा इंग्लंड विरुद्ध दक्षिण आफ्रिका सामना, २६ सप्टेंबर रोजी होणारा भारत विरुद्ध बांगलादेश सामना आणि ३० ऑक्टोबर रोजी होणारा उपांत्य फेरीचा सामना आता नवी मुंबईत होणार आहे. अंतिम सामना नवी मुंबई किंवा कोलंबोमध्ये खेळवला जाऊ शकतो.

महासागर NASHIK Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाऊंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**